। लातूर । वर्ष ३४ वे । अंक १९१ वा । सोमवार, दिनांक २० ऑक्टोबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.

RNI 47034/64

# लातूर समाचार

(सांज दैनिक)

प्रकाशन: लातूर

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

Email-dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिल्या दिवाळीच्या शुभेच्छा



**मुंबई/प्रतिनिधीः** महाराष्ट्र व गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी दिवाळीनिमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

दिवाळीचा सण अंधकारावर प्रकाशाचा, अन्यायावर न्यायाचा आणि नकारात्मकतेवर सकारात्मकतेच्या विजयाचे प्रतीक आहे. या निमित्त सर्वांना स्वदेशी उत्पादनांचा स्वीकार करण्याचे आवाहन करतो. पर्यावरण रक्षण, नैसर्गिक संसाधनांचा आदर आणि नैसर्गिक शेती यासारख्या शाश्वत जीवन मूल्यांचा अवलंब करून उज्वल, समृद्ध आणि स्वावलंबी भारताच्या उभारणीत सहभागी व्हावे, असे आवाहन करतो. ही दिवाळी सर्वांच्या जीवनात आनंद, शांती, आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवो या शुभेच्छा देतो, असे राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

## अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत राज्यात

# ४८ आस्थापनांचे परवाने निलंबित



**मुंबई/प्रतिनिधीः** अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत राज्यात 'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा' हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १२ ऑक्टोबर २०२५ पर्यंत राज्यात ३ हजार ४८५ अन्न आस्थापनांची तपासणी करण्यात आली. तपासणीमध्ये दूध, खवा/मावा, खाद्यतेल, तूप, मिठाई, ड्रायफ्रूट्स, चॉकलेट्स, भगर व अन्य अन्नपदार्थांचे एकूण ४ हजार ६७६ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. या तपासणीत अनियमितता आढळलेल्या एक हजार ४३१ आस्थापनांना सुधारणा नोटीस देण्यात आली असून ४८ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले तर एका आस्थापनेचा परवाना रद्द करण्यात आला असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाने दिली आहे.

जनतेस सुरक्षित, दर्जेदार अन्न उपलब्ध करून देण्यासाठी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री योगेश कदम, सचिव धीरज कुमार व आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न व औषध प्रशासना विभागांमार्फत राज्यात सणासुदीच्या कालावधीत अन्नपदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी 'सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षिततेचा' हे विशेष तपासणी अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान दिनांक ११ ऑगस्ट २०२५ ते २५ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

नागरिकांनीही सणासुदीच्या काळात अन्नपदार्थ खरेदी करताना गुणवत्ता, पॅकिंगवरील माहिती आणि परवाना क्रमांक यांची खात्री करूनच खरेदी करावी. भेसळीबाबत संशय आल्यास जवळच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाने केले आहे.

## निवडणूक आयोगाविरोधात १ नोव्हेंबरला मुंबईत विराट मोर्चा

**मुंबई/प्रतिनिधीः** निवडणुकीतील मॅच फिक्सिंगविरोधात विरोधकांचा लढा आहे. घुसखोर मतदारांना यादीतून बाहेर काढणे ही लोकशाहीची गरज आहे मात्र निवडणूक आयोग विरोधकांचे आक्षेप गांभीर्याने घेत नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या मनमानी आणि भ्रष्ट कारभाराविरोधात येत्या १ नोव्हेंबरला मुंबईत सर्वपक्षीय विरोधकांचा विराट मोर्चा काढण्यात येईल. या मोर्चातून निवडणूक आयोगाला दणका देण्याचं काम विरोधक करतील अशी घोषणा खासदार संजय राऊत यांनी केली आहे. शिवसेना भवन येथे झालेल्या सर्वपक्षीय विरोधकांच्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील, मनसेचे नेते बाळा नांदगावकर, काँग्रेस नेते सचिन सावंत, कम्युनिस्ट नेते प्रकाश रेड्डी यांच्यासह इतर नेते उपस्थित होते. या पत्रकार परिषदेत संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्रातील मतदार यादीत घुसलेले ९६ लाख म्हणजे जवळपास १ कोटी मतदार यांना बाहेर काढले पाहिजे. पैठणच्या आमदारांनी जाहीररित्या २० हजार मतदार बाहेरून आणले असं सांगितले. दुबार मतदारांची नावे देऊनही ती यादीतून काढली जात नाहीत असं सत्ताधारी भाजपाच्या आमदार मंदा म्हात्रे सांगतात.

बुलढाणा जिल्ह्यात १ लाखाहून अधिक बोगस मतदार नोंदवले गेले असं तिथले आमदार संजय गायकवाड सांगतात. निवडणूक मतदानात घोटाळा करून हे लोक सत्तेत आले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व प्रमुख पक्ष या मतदार यादीतील घोटाळ्याविरोधात लढत आहेत. निवडणूक आयोगाने गुन्हेगारी कृत्य केले आहे. अधिकारी ऐकायला तयार नाहीत. निवडणूक आयोगाला दणका द्यावा लागेल आणि तो रस्त्यावर उतरून द्यावा लागेल.

निवडणूक आयोगाच्या मनमानी आणि भ्रष्ट कारभाराविरोधात १ नोव्हेंबरला मुंबईत सर्वपक्षीय विराट मोर्चा निघेल. महाराष्ट्राच्या जिल्हाजिल्ह्यातून मतदानाचा अधिकार गमावलेले लाखो लोक मुंबईत येतील. ही ताकद देशाचे पंतप्रधान , गृह मंत्री यांना दाखवून देतील. या मोर्चाचे नेतृत्व शरद पवार, उद्धव ठाकरे, राज ठाकरे आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते करतील असी त्यांनी सांगितले.

## शेटकार कुटुंबांकडून १.३४ लाख मुख्यमंत्री सहाय्यता निधीस सुपुर्द:७५ व्या वाढदिवसानिमित्त मदत, २० बॅग रक्तदान



**उदगीर/प्रतिनिधीः** उदगीर येथील रहिवासी तथा कॅनरा बँकेचे सेवानिवृत्त व्यवस्थापक अंतेश्वर माधवराव शेटकार व त्यांच्या कुटुंबियांनी आपल्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री साह्यता निधीसाठी एक लक्ष ३४ हजार रुपयांची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपुर्त केली. त्यानंतर रक्तदान शिबिराच्या माध्यमातून त्यांनी आपला वाढदिवस साजरा केला, यात २० बॅग रक्त डोनेट करण्यात आले.

उदगीर येथील रहिवासी अंतेश्वर माधवराव शेटकार हे काहि वर्षांपूर्वी कर्नाटक राज्यातील बिदर कॅनरा बँकेच्या शाखेतून व्यवस्थापक म्हणून सेवानिवृत्त झाले. ते उदगीर येथे स्थायीक आहेत. काल त्यांनी आपला ७५ वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला. यावेळी रक्तदान शिबीर घेण्यात आले, यात २० बॅग संकलित करत रक्तदानाच्या राष्ट्रिय कार्यात शेटकार कुटुंबियांनी योगदान दिले. तसेच राज्यातील अतिवृष्टी ग्रस्त जनतेला मदतीसाठी आपलाही खारीचा वाटा असवा या सामाजिक जाणिवेने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी कुटुंबिया तर्फे १ लाख ३४ हजार ६०२ रुपयांचा निधी धनादेशाद्वारे उदगीर तहसीलदारांकडे सुपूर्त केला. यावेळी निवासी नायब तहसीलदार विलास सोनवणे, पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार राजश्री भोसले, ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय उदगीर केंद्राच्या संचालिका महानंदा बहन, बसवराज पाटिल नागराळकर, रमेश अंबरखाने, डॉ. बसवराज शेटकार उपस्थित होते.

## निडेबन येथे विहिरीत पडून एकाचा मृत्यू

**उदगीर/प्रतिनिधीः**निडेबन शेत शिवारातील एका ३० वर्षीय तरुणाचा विहिरीत पडून बुडून मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात शनिवारी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. याबाबत पद्माकर गंगाधरराव मामुलवार (रा. निडेबन वेस, भोई गल्ली, उदगीर) यांनी पोलिसात दिलेल्या खबरीनुसार मयत गंगाधर मारोती मामुलवार (३०, रा. निडेबन शेल्हाळ रोड, उदगीर) हा शुक्रवारी ते शनिवारी दुपारी १:३० वाजताच्या दरम्यान निडेबन शेतशिवारातील नागनाथ कोंडिबा रंगवाळ यांच्या शेत सर्वे क्र. ९८ मधील विहिरीत पडून पाण्यात बुडून मयत झाला. याप्रकरणी उदगीर ग्रामीण पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलिस हवालदार किवंडे करीत आहेत.

## सरकारी कार्यालयात 'आयडी' कम्पल्सरी; न लावल्यास होणार वेतनामध्ये कपात..!



**लातूर/प्रतिनिधीः** शासकीय कार्यालयात नागरिकांना अनेकदा अधिकारी, कर्मचाऱ्यांची ओळख पटत नाही. तसेच कर्मचारी भासवून खासगी व्यक्तींची लुडबुड सुरू असते. यामुळे अनेक गैरप्रकार आणि वाद होतात. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांना ओळखपत्र लावणे बंधनकारक करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने शासकीय कार्यालयाकडून ओळखपत्र तयार करण्याचे काम सुरू आहे.

दरम्यान, लातूर महापालिकेतही अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या ओळखपत्रांचे काम सुरू झाले आहे. राज्यातील सर्व शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना दर्शनी भागावर ओळखपत्र न लावल्यास शिस्तभंगाच्या कारवाईचा आदेश जारी केला आहे. तसेच एक दिवसाचा पगार कापण्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे ओळखपत्र तयार करण्याच्या कामाला प्रारंभ झाला आहे. सध्या काही मोजके कर्मचारी ओळखपत्राचा वापर करतात. अन्य कर्मचारी करत नाहीत. त्यामुळे आस्थापना विभागाकडून ओळखपत्र बनवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. अनेक कार्यालयात ओळखपत्र नसल्याने कर्मचारीच ओळखू येत नाहीत. त्यामुळे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.

मनपा आस्थापनावर हजारच्या आसपास कर्मचारी आहेत. त्यांचे ओळखपत्र बनवण्याचे काम सुरू आहे. ओळखपत्रांचे वाटप झाल्यानंतर त्यांना वापरणेत बंधनकारक केले जाणार आहे.

**–अभिमन्यू पाटील,**
**मनपा, आस्थापना विभाग प्रमुख.**

## जेईई मेन २०२६ परीक्षेच्या तारखा जाहीर

**नवी दिल्ली /वृत्तसेवाः** नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) ने जेईई मेन २०२६ परीक्षेच्या तारखा जाहीर केल्या आहेत. ही परीक्षा जानेवारी आणि एप्रिल दोन्ही सत्रांमध्ये घेतली जाईल. एनटीएनुसार, सत्र १ परीक्षा २१ ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान घेतली जाईल व सत्र २ परीक्षा १ ते १० एप्रिल २०२६ दरम्यान घेतली जाईल ज्याची नोंदणी प्रक्रिया ऑक्टोबर २०२५ मध्ये अधिकृत वेबसाइट jeemain.nta.nic.in वर सुरू होईल.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



एकीकडे महागाईचा चटका आणि दुसरीकडे ऑक्टोबर हिटचा चटका...!

## चिमटा दयाचा



लातूरचे मध्यवर्ती बसस्थानक छ. शिवाजी महाराज चौकातील डेपो मध्ये स्थलांतर केले पाहिजे ! तरच वाहातुकीस शिस्त लागणार आहे !!



ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# सणात इतरांचाही विचार करावा

दिवाळीचा सण साजरा करताना यावर्षी इतरांचा विचार केला पाहिजे. यावर्षी सणात म्हणावा तसा उत्साह दिसून येत नाही. सप्टेंबर मध्ये मोठा पाऊस झाला. या पावसाने मोठे संकट राज्याबरोबर मराठवाड्यात निर्माण झाले. शेतकऱ्याकडे तेवढे होते ते निसर्गाने हिराऊन घेतले. केवळ पिकच नाही तर शेतातील माती सुद्धा खरडून गेली आहे. यापुर्वी असे संकट आले नव्हते, एवढे संकट यावेळी मराठवाड्यातील जनतेवर आले आहे. नैसर्गिक संकट तसे मोठे असते. केवळ शेतीचे नाही जर घराचे नुकसान झाले. गावातील शाळा, कच्ची घरे पडली, रस्ते उखडून निघाले. पूल वाहून गेले. सर्वाधिक पशुधनाचे नुकसान झाले. पशुधन वाहुन गेले. काही गागात माणसे ही वाहुन गेले. मराठवाड्यातील शेतकरी हा गरीब आहे. त्याच्याकडे मोठे बँक बॅलेंस नाही. घरात साधारण आर्थिकस्थिती पहावयास मिळते. त्याच प्रमाणे सर्व काही शेतीतील उत्पादनावर आवलंबून असते. अशा स्थितीत निसर्गाचा मारा मोठा बसला. सरकारने मोठ्या प्रमाणात दिवाळीच्या सणाच्यावेळी मदत करणे अपेक्षित होते. सरकारी काम म्हणजे पंचनामे, नुकसानाची पाहाणी आदि कायदेशीर बाबीत वेळ जातो. त्यांची ती प्रक्रिया दिसून येते, मात्र सध्याला दिवाळी सारख्या मोठ्या सणाच्यावेळी हात ढिला ठेवणे काळाची गरज होती. एकीकडे शेतकऱ्याबाबत कैवार निर्माण करून बोलले जाते तर दुसरीकडे नुकसानीबाबत मदतीत दिरंगाई होते. आता दिवाळीचा सण सुरू झाला आहे. मात्र दिवाळी सणा सारखी परिस्थिती दिसून येत नाही. दिवाळी सारखी रोषणाई असो किंवा सजावट असो ती दिसून येत नाही. अशा स्थितीत सण कसा साजरा करणार. सणाच्यावेळी जी बाजारात खरेदीसाठी झुंबड दिसून येणे अपेक्षित होते ती दिसून येत नाही. मराठवाड्यातील शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. ते भरून येण्यासाठी किती वेळ लागतो हे सांगणे कठिण आहे. एक तर शेतात अजूनही पाणी आहे व पाण्यात सोयाबिन आहे. ते काढणे अशक्य आहे. शेंगा ओल्या होऊन मोड फुटत आहेत. डॅमेज सोयाबिन झाल्याने यासाठी सरकारने वेगळा दर जाहिर केला पाहिजे. काही झाले तरी राज्यातील खराब सोयाबिनचा प्रश्न निर्माण झाला आहे. एकतर मराठवाड्यात मोठया प्रमाणात सोयाबिनचा पेरा होता. उन्हाळ्यात पाऊस झाल्याने जून मध्ये पाण्याची कमतरता भासली नाही. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचे संकट निर्माण झाले नाही. चांगले पीक हाती लागेल व दिवाळी जोरदार होईल अशी आशा होती. खरीपाचे पीक हाती लागेल असे वाटत असताना सप्टेंबरमध्ये निसर्ग कोपला व सर्वत्र पाणीच-पाणी केले. त्यामुळे मराठवाड्यावर मोठे संकट आले, अशा संकटात दिवाळीचा सण कसा साजरा करावा, नवीन कपडे कसे मुला-बाळास घ्यावीत असा प्रश्न निर्माण झाला आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे दिवाळीत गोड-धोड करण्यासाठी साहित्य आणण्यासाठी पैसा नाहीत. अतिषय कमी रक्कम काही शेतकऱ्याच्या खात्यात जमा केली आहे. नुकसान मोठे आहे हे सरकारच्या लक्षात आले आहे. अशा स्थितीत मदत देणे अपेक्षित होते. मदत केली पाहिजे. असे वाटत असले तरी सर्व काही शांतच दिसून येत आहे. शेतात जर सोयाबिन मोठ्या प्रमाणात हाती आले असते तर दिवाळी मोठ्या प्रमाणात साजरी केली असते. मराठवाड्यावर संकट आल्याने बाजारात सणाच्यावेळी म्हणावी तशी गर्दी दिसून आली नाही. ज्यावेळी बाजारात शेतकरी मोठ्या प्रमाणात माल घेऊन येतात त्याच वेळी कापड, भुसार व ईतर ठिकाणी खरेदीसाठी गर्दी दिसून येते. यावेळी काय झाले तर शेतकऱ्याकडे माल नाही, पावसाने सर्व धुवुन गेले. किमान सोयाबिन हाती लागली असते तर दिवाळी काही प्रमाणात साजरी करता आली असती. आज आर्थिक परिस्थितीच खालावली आहे. शेतात पिक नाही. जनावरांना चारा नाही. कडबा नाही. पशुधनाची वाट लागली. सर्व बाजूने नुकसान झाल्याने सण कसा साजरा करावा. केवळ शेतकऱ्याकडे पैसा आला नाही म्हणून बाजारात मोठ्या प्रमाणात खरेदी दिसून येत नाही. वर्षभरातील सर्वात मोठा सण दिवाळीचा असतो. त्या सणात मदत करणे अपेक्षित असते. एक तर आनंदाचा शिधा बंद केला. दुसरे बहिणीस तेलाचा डब्बा देण्याचे आश्वासन दिले आहे. दिवाळीचा सण चालू झाला आहे. आता मदत शक्य वाटत नाही. बँका बंद असणार. सरकारी कार्यालयास सुट्टी असणार मग मदत कशी मिळणार, वास्तविक सरकारने दिवाळी पुर्वीच मोठ्या प्रमाणात मदत केली पाहीजे होती. सणाच्या नंतर पंचनाम्यानंतर मदत करणे योग्य ठरणारे नाही. त्याचा उपयोग काय? जर शेतकऱ्याबाबत आपुलकी असती तर दिवाळीचा सण डोळ्या समोर ठेऊन मदत करणे अपेक्षित होते. यापुढे मदतीचा काहीच उपयोग होणार नाही. मुळात सरकारने नगदी खात्यावर रकमा जमा करण्याबरोबर रेशन दुकानातून सणाचे साहित्य वाटत केले असते तर दिवाळी आनंदात गेली असती तीही दिसून येत नाही. मुळात मोफत नाही तर शंभर रूपयात आनंदाचा शिधा वाटत होत होता ती मोठी मदत होती. अल्प प्रमाणात का होईल सण प्रत्येक गोरगरीबाने साजरा केला आसता. सध्याला आर्थिक आडचणीत सापडलेला शेतरकऱ्याच्या घरात आंधार पाहावत नाही. सर्व बाबी पैशाशिवाय शक्य नाहीत हे तरी सर्वांना माहिती आहे. तरी सण तोंडावर आला. दिवाळी सुरू झाली तरी हाती पैसा नाही. कर्ज काढावे म्हटले तरी समोरच्या कशाच्या भरोशावर मदत करेल, यावर्षीची दिवाळी आनंद देणारी नाही. सणच साजरा होती का नाही अशी स्थिती दिसून येत आहे. बाजारातील खाण्याच्या पदार्थाच्या खरेदीच्या ठिकाणी गर्दी नाही. नवीन कपडे खरेदीच्या दुकानात शुकशुकाट दिसून येत आहे. फटाके स्टॉलवर बालगोपाळावर गर्दी होती तीही दिसून येत नाही. मुळात पावसाच्या संकटाचा तडाखा मोठा आहे. त्यात सरकारने आखडता हात घेतल्याने शेतकरी दिवाळी साजरा करतील का नाही ही शंकाच आहे. यावर्षीची दिवाळी तशी आनंदाची दिसून येत नाही.त्यामुळे इतरांनी विचार करणे अपेक्षित दिसून येते. ज्यांच्याकडे धन आहे त्यांनी तरी मदतीचा हात पुढे केला पाहिजे.

# लक्ष्मीपूजन : समृद्धीचा उजेड आणि अंतर्मनाचा प्रकाश



दिवाळी म्हणजे अंधारावर प्रकाशाचा विजय. परंतु हा प्रकाश केवळ दिव्यांच्या ज्योतीत नसतो; तो मनाच्या शुद्धतेत, विचारांच्या तेजात आणि संवादाच्या ऊबेतही झळकतो. दरवर्षी जसा कार्तिक अमावास्येच्या रात्री लक्ष्मीपूजनाचा सण येतो, तसाच तो भारतीय मनाच्या स्वभावाशी एकरूप होतो. दिव्यांच्या रांगा, सुगंधी हवा, घंटांचा नाद आणि प्रसन्न चेहऱ्यावरील तेज हे सर्व केवळ बाह्य सौंदर्य नाही, तर संस्कृतीच्या दीर्घ परंपरेचा सजीव श्वास आहे.

दिवाळी हा केवळ आनंदाचा नाही, तर आत्मशुद्धतेचा सण आहे. 'अंधारातून प्रकाशाकडे' हा मंत्र या काळात नव्या अर्थाने जागतो. लक्ष्मीपूजनातला हा प्रकाश केवळ सुवर्णमुद्रांचा नाही, तो अंतर्मनातील विवेक, संयम आणि कृतज्ञतेचा आहे. संपत्ती म्हणजे केवळ धन नव्हे; समृद्धी म्हणजे नीती आणि संतुलन. म्हणूनच लक्ष्मीपूजन मूळात एक मूल्यसंस्काराचा उत्सव आहे.

'लक्ष्मी' हा शब्द 'लक्ष्य' या धातूपासून आलेला आहे. त्यामुळे लक्ष्मी म्हणजे जी आपल्याला योग्य लक्ष्य साध्य करण्याची प्रेरणा देते. ती फक्त संपत्तीची नव्हे, तर संतुलित जीवनशैलीची प्रतीक आहे.

अष्टलक्ष्मीच्या रूपांत धर्मलक्ष्मी, धनलक्ष्मी, धान्यलक्ष्मी, संतानलक्ष्मी, सौंदर्यलक्ष्मी, विजायलक्ष्मी, ऐश्वर्यलक्ष्मी आणि विद्यालक्ष्मी जीवनाचे बहुविध पैलू प्रकट होतात. धनलक्ष्मी पोटभर अन्न देते, तर विद्यालक्ष्मी विचारांचा उजेड फेकते. लक्ष्मीपूजन हे या सर्व शक्तींचा सन्मान आहे, ज्या आपल्या अस्तित्वात बिंबलेल्या आहेत.

लक्ष्मीपूजन हे कृतज्ञतेचे प्रतिक आहे. आज व्यापारी आपली नवी बही पूजा करतात, शेतकरी शेतातील पिकांसाठी कृतज्ञता व्यक्त करतो, आणि गृहिणी घरात सौख्य राखते. पूजेतील प्रत्येक कृती कलश, नारळ, स्वस्तिक किंवा फ ुले हे केवळ प्रतीक नाहीत, तर मूल्यांचे स्मरण आहेत. कलशातील जल शुद्धतेचे, नारळ स्थैर्याचे, स्वस्तिक शुभतेचे आणि फुले कृतज्ञतेचे द्योतक आहेत. केरसुणी पूजनातही हा गूढ अर्थ उमटतो. 'अलक्ष्मी निवारण' म्हणजे दुःस्वभाव, लोभ आणि मत्सर यांपासून स्वतःला मुक्त करणे. दिव्यांची रांग जशी अंधाराला हद्दपार करते, तसा हा संस्कार आपल्या दुर्गुणांना झाकोळतो.

लक्ष्मीपूजनाची खरी अर्थवत्ता धनप्राप्तीमध्ये नाही, तर मनःशांतीत आहे. जैन परंपरेनुसार, भगवान महावीर मोक्षप्राप्तीनंतर याच रात्री गौतम गणधरांना केवळ ज्ञान प्राप्त झाले ''ज्ञानलक्ष्मी''च्या रूपात. म्हणून ही रात्र आत्मकल्याणाची स्मृती आहे. भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे ''संयम, श्रद्धा आणि सत्कर्मातच खऱ्या समृद्धीचा वास असतो.'' लक्ष्मी म्हणजे श्रद्धेचा उजेड, लोभाचा अंधार नाहीसा करणारी शक्ती.

आजच्या काळात लक्ष्मीपूजनाचे स्वरूप बदलले आहे. उपभोक्तावाद, ऑनलाइन व्यवहार आणि झगमगाटाच्या युगातही हा सण आपल्याला भावतो संपत्ती कमवा, पण ती सत्य आणि नीतीच्या मार्गाने उपभोगा. ''सस्टेनेबल समृद्धी'' म्हणजे केवळ आर्थिक स्थैर्य नव्हे; ती पर्यावरण, सामाजिक न्याय आणि नैतिकतेच्या संतुलनातून येते. स्वदेशी उत्पादनांचा वापर, पर्यावरणपूरक सण आणि ईमानदारी ही आधुनिक लक्ष्मीपूजनाची नवी भाषा आहे.

या दिवशी संध्याकाळी घरोघरी दीप लावले जातात. मंद वायूत वहात असलेला फुलांचा सुवास, आरतीच्या ध्वनींसह लखलखणारे दिवे जणू प्रत्येक घर मंदीर झाले आहे. ओवाळणीवेळी स्त्रियांच्या मुद्रेवर उमटणारे तेज जीवनाची खरी समृद्धी दाखवते; मुलांच्या हातातील फुलबाज्या आणि वृद्धांच्या आशीर्वादातील ऊब हा आनंदाचा प्रकाश कायम टिकवते. ही रात्र केवळ पूजा नाही, तर कुटुंबांच्या नात्यांचा पुनर्बंध आहे.

लक्ष्मी म्हणजे नशिबाची देणगी नव्हे; ती परिश्रम, श्रद्धा आणि सत्यतेची प्रसादरूप समृद्धी आहे. लक्ष्मीपूजन शिकवते संपत्ती कमवा, पण ती सन्मार्गाने खर्च करा. अमावास्येच्या काळोखात जसा एक दीप संपूर्ण घर उजळवतो, तसाच नीतिचा, विवेकाचा दीप अंतर्मनात उजळला पाहिजे.या प्रकाशोत्सवात प्रत्येकाने आपल्या अंतर्मनात 'नीतीलक्ष्मी' जागवावी. कारण खरी संपत्ती म्हणजे पैसा नव्हे, तर संयम, कृतज्ञता आणि करुणा. दिवाळीच्या दिव्यांचा प्रकाश बाहेरच्या अंधाराला नाही तर आपल्या आतल्या लोभ-अंधाराला दूर करतो. म्हणून प्रत्येक दीप हा एक संकल्प असावा ''सत्य, श्रम व सदाचार यांच्या उजेडातच लक्ष्मी नांदते.'' लक्ष्मीपूजन म्हणजे धनवाढीची अपेक्षा नव्हे, तर आत्मविकासाची आराधना आहे. समृद्धी ही नशिबाचा परिणाम नसून संस्कार आणि सत्यतेचा प्रसाद आहे.

अमावास्येच्या काळोखात जसा दीप उजळतो, तसाच श्रद्धेचा आणि सचोटीचा दीप आपल्या अंतर्मनात उजळावा, हीच या सणाची खरी भावना आहे. आधुनिक युगातही, दिवाळीचा दिवा फक्त घर उजळवत नाही, तो मनातील लोभ-अंधारही दूर करतो. या प्रकाशोत्सवात, दिव्यांच्या रांगेत उभा प्रत्येक मनुष्य आपल्या अंतर्मनातील 'नीतीलक्ष्मी'ला जागवो, आणि त्या प्रकाशात समृद्धी, शांती व सौंदर्य नांदो हीच शुभेच्छा!

**-राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
मो. ९८९०५७७१२८

# दुसरे मुले का कधीच कुणाचे ऐकत नाही, पालकांना देखील होतो मन:स्ताप

ज्या घरात एकापेक्षा अधिक मुलं असतील त्या प्रत्येक मुलाचा स्वभाव, वागणुक अतिशय वेगळी असते. काही मुले खूप मस्तीखोर असतात तर काही मुले शांत स्वभावाची असतात. सामान्यत: असे दिसून येते की, कुटुंबातील मोठी मुले शांत स्वभावाची असतात तर लहान मुले नखरेबाज आणि खोडकर असतात. ते कुटुंबात समस्या किंवा अराजकता निर्माण करतात असेही म्हटले जाते आणि तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की, रिसर्चमध्ये देखील याला मान्यता मिळाली आहे. एमआयटीचे अर्थशास्त्रज्ञ जोसेफ डॉयल यांनी केलेल्या अभ्यासानुसार, दुसऱ्या जन्मलेल्या मुलांमध्ये बंडखोर वागण्याची शक्यता जास्त असते आणि जर तुमचा दुसरा मुलगा असेल तर ही शक्यता दुप्पट होते.

**संकट उभी करतात**

दुसऱ्या मुलामध्ये शाळेत खोडसाळपणा करण्याची २५ ते ४० टक्के शक्यता असल्याचे या अहवालातून समोर आले आहे. ते मोठे झाल्यावरही ते खूप त्रास देऊ शकतात. तज्ञांचा असा विश्वास आहे की पालक त्यांच्या मोठ्या मुलाबद्दल थोडे अधिक कठोर असतात आणि त्यांच्या दुसऱ्या मुलाबद्दल थोडे अधिक नम्र असतात. त्याच वेळी, मुलासाठी रोल मॉडेल त्याच्या भाऊ किंवा बहिणीपेक्षा वेगळे आहे.

**शाळेत समस्या निर्माण होतात**

या अभ्यासात असे म्हटले आहे की, इतर मुलांना शाळेतील शिस्त पाळण्यात अडचणींचा सामना करावा लागतो. शाळेत नियम तोडण्यात ही म ुलं आघाडीवर असतात आणि शिक्षकांना अडचणीत आणतात असंही तुम्ही म्हणू शकता. त्यांना शाळेतून काढून टाकण्याची शक्यताही जास्त आहे.

**याचे कारण काय आहे**

संशोधनात संशोधकांनी सांगितले की, याचे एक कारण हे असू शकते की पालक पहिल्या मुलाकडे जास्त लक्ष देतात आणि ते दुसऱ्या मुलाकडे कमी लक्ष देऊ शकतात. जर तुम्हाला देखील दोन मुले असतील तर कदाचित तुम्हाला हे अधिक खोलवर समजेल आणि जर तुम्ही तुम च्या दोन्ही मुलांसोबत असे काही करत असाल तर आत्ताच तुमची चूक सुधारायला सुरुवात करा.

**चुकीचे रोल मॉडेल**

मोठ्या मुलांसाठी, त्यांचे रोल मॉडेल सहसा प्रौढ असतात, परंतु लहान मुलांसाठी किंवा दुसऱ्या मुलांसाठी, त्यांचे आदर्श त्यांची मोठी भावंडे किंवा दोन-तीन वर्षांची मुले असतात. अशा परिस्थितीत मुलांना त्यांच्या आदर्शांकडून फार काही शिकायला मिळत नाही. या परिस्थितीत मोठी मुले शर्यतीत पुढे जातात तर लहान मुले मागे राहतात किंवा चुकीचा मार्ग स्वीकारतात.

# वातावरण बदलताच ॲसिडिटीचा त्रास होतोय, ३ आयुर्वेदिक उपायांनी मिळेल कायमचा आराम

जेव्हा हवामान बदलते, तेव्हा आपण सर्दी, फ्लू आणि इतर विषाणूजन्य संसर्गास बळी पडतो. कारण या काळात आपली प्रतिकारशक्ती खूप कमकुवत होते. पण जेव्हा आपण पावसाळा या ऋतूमधून हिवाळ्यात प्रवेश करतो. हिवाळ्याच्या सुरुवातीला, एक समस्या लोकांना खूप त्रास देते, ती म्हणजे ॲसिडिटी. पण या काळात ॲसिडिटीचा त्रास का होतो हे तुम्हाला माहिती आहे का? आयुर्वेदानुसार ऋतू बदलला की शरीरातील त्रिदोषचे संतुलन बिघडते. वात, पित्त आणि कफ हे तीन दोष आहेत. हिवाळा सुरू होताच शरीरात पित्तदोष वाढतो, ज्यामुळे पचनाच्या समस्या निर्माण होतात. याच कारणामुळे या काळात पोटात गॅस, फुगवणे आणि ॲसिडिटी सारख्या समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येतात. चांगली गोष्ट म्हणजे या काळात काही सोप्या टिप्स फॉलो करून तुम्ही शरीरातील पित्त दोषाचे संतुलन सहज राखू शकता आणि ॲसिडिटीपासून आराम मिळवू शकता.







असिडिटीपासून आराम मिळवण्यासाठी आयुर्वेदिक उपाय

**काळ्या मनुकाचे सेवन करा**

तुम्हाला रोज रात्री झोपण्यापूर्वी १० ते १५ काळे मनुके घ्यावे लागतील, त्यानंतर ते चांगले धुवून एक कप पाण्यात भिजवावे. दुसऱ्या दिवशी सकाळी रिकाम्या पोटी रात्रभर पाण्यात भिजवलेले मनुके खा आणि पाणीही प्या. हे शरीरातील पित्त दोष संतुलित करण्यास खूप मदत करेल.

**त्रिफळा चूर्ण आणि तूप मिसळून खा**

रात्री झोपण्यापूर्वी एक ग्लास कोमट पाणी प्या. त्यानंतर प्रत्येकी एक चमचा त्रिफळा चूर्ण आणि तूप घेऊन दोन्ही चांगले मिसळा. ते कोमट पाण्याने गिळावे.

**कोथिंबिरीचे पाणी प्या**

यासाठी १-२ चमचे धणे घेऊन ते ठेचून घ्यावेत. एका ग्लास पाण्यात टाका आणि रात्रभर राहू द्या. आपण इच्छित असल्यास, आपण ते फक्त ८ तासांसाठी झाकून ठेवू शकता. दुसऱ्या दिवशी सकाळी हे पाणी एका कपम ध्ये गाळून घ्या. त्यात चिम ूटभर रॉक मीठ, मध किंवा साखर घालून रिकाम्या पोटी सेवन करा. याव्यतिरिक्त, आपण दिवसभर पिऊन त्याचे आरोग्य फायदे घेऊ शकता.

डॉक्टर काय सांगतात?

तज्ज्ञांनी सांगितलेल्या या सोप्या आयुर्वेदिक टिप्सचे पालन केल्याने तुमची ॲसिडिटीपासून लवकर सुटका होऊ शकते. यामुळे तुमच्या पचनाच्या समस्या दूर होण्यास मदत होईलच पण रोगांचा धोका कमी होण्यासही मदत होईल. परंतु हे सेवन करूनही तुम्हाला ॲसिडिटीपासून आराम मिळत नसेल तर तुम्ही ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधावा.

# रहार्ट अटॅकपासून वाचण्यासाठी तरूणांनी कधी करावी कोलेस्ट्रॉल चाचणी?



हृदयाचे आजार हे सध्या खूपच लहान वयात मोठ्या समस्येचं कारण ठरत आहेत. अगदी ८ किंवा १० वर्षांच्या मुलांनाही हृदयविकाराचा झटका आल्याचं समोर आलं आहे. याला नेमकं काय कारण असं शकतं याबाबत वेळोवेळी तज्ज्ञ सावध करत असतात. अनुवांशिक असेल, ताणतणाव असेल किंवा आहार अशी अनेक कारणं असतात. जेव्हा तुमच्या कुटुंबात लहान वयात हृदयविकाराचा झटका येण्याचा इतिहास असतो, तेव्हा तुम्हाला हाय कोलेस्ट्रॉल, हाय ब्लड प्रेशर किंवा हृदयरोगासाठी इतर कारणीभूत असणारे घटक अनुवांशिकरित्या मिळू शकतात. काही रूग्णांना फॅमिलिअल हायपरकोलेस्टेरोलेमिया असतो, हा एक अनुवांशिक विकार असतो ज्यामध्ये तुमचे शरीर तुमच्या रक्तातून एलडीएल कोलेस्ट्रॉल प्रभावीपणे काढून टाकू शकत नाही. त्यामुळे रक्तप्रवाहात ते जमा होते, अशी माहिती बंगळुरूमधील हॉस्पिटलमधील प्रमुख हृदयरोगतज्ज्ञ आणि वैद्यकीय संचालक डॉ. रंजन शेट्टी यांनी दि इंडियन एक्सप्रेसशी बोलताना दिली. एकूण कोलेस्ट्रॉल म्हणजे कमी घनतेचे लिपोप्रोटीन (एलडीएल) किंवा वाईट कोलेस्ट्रॉल, उच्च घनतेचे लिपोप्रोटीन (एचडीएल) किंवा चांगले कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसराइड्स किंवा जास्त कॅलरीजपासून मिळणारे रक्तातील चरबी यांचे मिश्रण.

कोलेस्ट्रॉलवर लक्ष ठेवणे का गरजेचे?

शरीरात कोलेस्ट्रॉल धोकादायक पातळीपर्यंत पोहोचण्यासाठी बराच वेळ लागतो. प्लेक तयार होण्यास साधारणपणे एखाद्या व्यक्तीच्या बालपणापासूनच सुरूवात होते. अंदाजे १० वर्षांपासून ही प्रक्रिया होत असते. प्रत्यक्षात तुम्हाला लाइफस्टाइलमधील सुधारणांसह स्वत:ला सुधारण्यासाठी वेळ मिळतो. एकदा ते उच्च पातळीपर्यंत पोहोचले की ते कमी करण्यासाठी तुम्हाला औषधांची आवश्यकता पडेल असे डॉ. शेट्टी यांनी सांगितले. त्यांची एक पेशंट जिला ३५व्या वर्षी हृदयविकाराचा झटका आला ती सांगते की, मला कोलेस्ट्रॉल आणि माझ्या कुटुंबाच्या मेडिकल हिस्ट्रीबाबत माहिती असती तर कदाचित मी माझा हृदयविकार रोखू शकले असते.

तरूणांनी कोलेस्ट्रॉल चाचणी कधी करावी?

डॉ. शेट्टी यांनी याबाबत सांगितले की, १८ ते २१ वयोगटातील मुलांनी त्यांचे कोलेस्ट्रॉल तपासले पाहिजे. ज्या मुलांना लहानपणापासून लठ्ठपणा किंवा मधुमेह या समस्या आहेत, त्यांची तपासणी निमितपणे करून घ्यावी. ज्यांना कौटुंबिक इतिहास किंवा इतर संबंधित आजार आहेत, त्यांनी दरवर्षी तपासणी करून घ्यावी.

# नसांमध्ये अडकलेला घाणेरडा कोलेस्ट्रॉल खेचून बाहेर काढेल हा पदार्थ

आजकाल लोकांमध्ये हाय कोलेस्ट्रॉलची समस्या साम ान्य झाली आहे. खरे तर हा आपल्या चुकीच्या खाण्याच्या सवयी आणि वाईट जीवनशैलीचा परिणाम आहे. आपल्या शरीरात दोन प्रकारचे कोलेस्ट्रॉल असते. प्रथम चांगले कोलेस्ट्रॉल आहे, जे शरीर निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक आहे. दुसरीकडे, खराब कोलेस्ट्रॉल आहे, जे शरीरासाठी चांगले मानले जात नाही. शरीरात खराब कोलेस्ट्रॉल वाढल्यामुळे अनेक गंभीर आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते. यामुळे हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक आणि कोरोनरी हृदयरोग यांसारख्या गंभीर आजारांचा धोका वाढू शकतो. त्यामुळे वाईट कोलेस्ट्रॉल कमी करणे अत्यंत आवश्यक आहे. किचनमध्ये ठेवलेले काही मसाले शरीरातील खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यासाठी खूप फायदेशीर ठरतात. या मसाल्यांमध्ये वेलचीचाही समावेश आहे. चला, या लेखात जाणून घेऊया उच्च कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी वेलची कशी फायदेशीर आहे आणि ती कशी वापरायची

उच्च कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी वेलची फायदेशीर

वेलचीचा वापर भारतीय स्वयंपाकघरात मसाला म्हणून केला जातो. जेवणाची चव वाढवण्यासोबतच ते आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. त्यात अनेक पोषक घटक आढळतात. वेलचीमध्ये व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, लोह, फॉस्फरस आणि अँटीऑक्सिडंटस यांसारखे अनेक पोषक घटक असतात, जे आरोग्यासाठी अनेक फायदे देतात. हे शरीरातील वाढलेले वाईट कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि चांगल्या कोलेस्ट्रॉलची पातळी वाढविण्यास मदत करते. तसेच शरीरात रक्त गोठण्यास प्रतिबंध करते. याच्या नियमित सेवनाने हृदयविकाराचा झटका आणि हृदयाशी संबंधित इतर आजारांचा धोका कमी होतो.

उच्च कोलेस्टेरॉलमध्ये वेलची कशी वापरावी

शरीरातील खराब कोलेस्ट्रॉलची वाढलेली पातळी कमी करण्यासाठी तुम्ही वेलचीच्या पाण्याचे सेवन करू शकता. हे तयार करण्यासाठी १-२ लहान वेलची सोलून एका ग्लास पाण्यात टाका. रात्रभर भिजत ठेवा आणि सकाळी हे पाणी उकळून घ्या. पाणी अर्धवट राहिल्यावर गाळून घ्या. हे पाणी सकाळी रिकाम्या पोटी प्या. याचे नियमित सेवन केल्यास उच्च कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत होते.

उच्च कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्याचे इतर मार्ग

उच्च कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी, निरोगी आणि संतुलित आहार घ्या. तुमच्या आहारात ताजी फळे, भाज्या आणि फायबरयुक्त पदार्थांचा समावेश करा.

कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यासाठी रोज व्यायाम आणि योगासने करा. कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी वजन नियंत्रित ठेवा. जर तुम्हाला कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करायची असेल तर तळलेले आणि चरबीयुक्त पदार्थ खाऊ नका.

# नैवेद्याची अर्पणयात्रा



ऋतुजा केळकर

देवासमोर ठेवलेला नैवेद्य म्हणजे केवळ पाककृती नव्हे, तर एक भावनांची अर्पणयात्रा असते आणि त्या यात्रेचा शेवट तुळशीच्या पानावर होतो जिथे भक्ती, प्रेम आणि नम्रता एकत्र येऊन देवाच्या ओंजळीत विरघळतात. तेव्हा शिरा म्हणजे केवळ अन्न राहत नाही तो एक प्रसाद होतो.

शिरा करायला घेतला की घरभर एक वेगळाच गंध दरवळतो. रव्याचा खमखमीतपणा, साजूक तुपाचा सुवास, उकळणाऱ्या दुधातली मृदूता आणि साखरेच्या गोडीत मिसळलेली एक अनाम भावना. पण गंमत अशी की, रोजच्या जेवणातला शिरा आणि सत्यनारायणाच्या पूजेसाठी केलेला नैवेद्य- दोघंही एकाच प्रमाणात बनवले जातात, तरीही त्यांची चव एकमेकांपासून किती वेगळी असते!

रोजचा शिरा भूक भागवतो पण नैवेद्याचा शिरा मन भरतो. त्याच्या प्रत्येक घोटात असते एक शांतता, एक समर्पण. रवा भाजताना मनात मंत्रांची नादमय गुंज भरते जणू, प्रत्येक कणात भक्ती शिजते. दूध उकळताना आठवणींचे फेसाळलेले क्षण उफाळून येतात, 'कधी आजीच्या हातचा शिरा, कधी आईच्या ओंजळीतला गंध'. साखर विरघळताना अहंकार हळूहळू वितळतो आणि मनात एक गोड नम्रता पाझरते. वेलदोड्याचा दरवळ मनाच्या कोपऱ्यात श्रद्धेचा सुगंध पसरवतो आणि शेवटी, त्यात मिसळतात केळ्याच्या मऊ-मऊ, गोड चकत्या जणू नैवेद्याला पूर्णत्व देणारा अंतिम स्पर्श. त्या केळ्यांत असते प्रसादाची कोमलता आणि देवाच्या ओंजळीत अर्पण होणाऱ्या भक्तीची गोडी, जणू देवाच्या सान्निध्यातील एक निस्संग श्वास.

शेवटी जेव्हा तो शिरा देवासमोर ठेवला जातो, तेव्हा त्यावर अलगद एक हिरवेगार तुळशीपत्र ठेवले जाते जणू, नैवेद्याच्या गोडीत एक भावनेचा शुद्ध स्पर्श मिसळला जातो. एक साधं पान, पण त्याच्या त्या पानाच्या नाजूक रचनेत दडलेलं असतं एक संपूर्ण भावविश्व. त्या पानात असते 'नम्रता' जिच्या ओंजळीत अहंकार विरघळतो. असतो समर्पण भाव जो शब्दांशिवायही देवापर्यंत पोहोचतो आणि असते एक न बोलता आलेली प्रार्थना हे देवा, हे तुझं आहे.

त्या तुळशीपत्राने खरंच चव बदलते का? की त्या क्षणाच्या पवित्रतेने? की त्या मनाच्या शुद्धतेने? की त्या अर्पणाच्या निःशब्द गहिराईने? त्या क्षणी शिरा केवळ अन्न राहत नाही तो प्रसाद होतो आणि तुळशीपत्र हे केवळ 'पान' राहत नाही, ते 'भक्तीचं प्रतीक' होतं. मी तर म्हणेन देवासमोर ठेवलेला नैवेद्य म्हणजे केवळ पाककृती नव्हे, तर एक भावनांची अर्पणयात्रा असते आणि त्या यात्रेचा शेवट तुळशीच्या पानावर होतो जिथे भक्ती, प्रेम आणि नम्रता एकत्र येऊन देवाच्या ओंजळीत विरघळतात. तेव्हा शिरा म्हणजे केवळ अन्न राहत नाही तो एक प्रसाद होतो. त्याच्या गोडीत मिसळलेली असते भक्तीची चव, श्रद्धेचा गंध आणि प्रेमाचा कोमल स्पर्श. रोजच्या शिरात जेव्हा आपण प्रेम मिसळतो, तेव्हा तोही नैवेद्य होतो आणि नैवेद्य अर्पण करताना जेव्हा आपण स्वतःला विसरतो, तेव्हा देव त्यात आपली ओळख शोधतो जणू, त्या गोडीतच त्याचं अस्तित्व उमटतं. शिरा बनवताना जर मनात देव असेल, तर तो नैवैद्य होतो. नैवेद्य बनवताना जर मनात भक्ती असेल, तर तो प्रसाद होतो. बाकी रवा, दूध, साखर ते तर सारच निमित्तमात्र अस मी म्हणेन खरी चव तर, त्या मनाच्या शुद्धतेत असते, त्या अर्पणाच्या निःशब्द भावनेत असते.मी काय म्हणते, नैवेद्य हा केवळ देवासाठी बनवलेला अन्नाचा अर्पण कधीच नसतो, तो तर काळाच्या, ऋतूच्या, मनःस्थितीच्या आणि स्थळाच्या स्पंदनांशी जुळून उमटणारा एक भावगंध असतो. आता श्रावणातल्या सरींमध्ये गरम गरम पुरणाचा नैवेद्य म्हणजे देवाच्या ओंजळीत ठेवलेली एक उबदार आठवण असते तर दिवाळीच्या प्रकाशात लाडवांचा नैवैद्य म्हणजे आनंदाचा सुवास असतो, जो देवापर्यंत पोहोचवताना मनही उजळून तेजाळून निघतं. संक्रांतीच्या सकाळी तीळगुळाचा नैवेद्य म्हणजे गोड बोलण्याची एक मौन शपथ तिळगुळ घ्या, गोड गोड बोला ही केवळ म्हण नसते, ती एक अंतःकरणाची तयारी असते.

ापल्या माणसांच्या प्रेमात, श्रद्धेत, आणि नम्रतेत. तेव्हा, रोजच्या जगण्यातही एक नैवेद्य घडवूया, असा नैवैद्य जो केवळ देवासाठी नव्हे, तर स्वतःच्या अंतरंगासाठी असतो आणि त्या नैवेद्याच्या गोडीत देव आपली ओळख शोधतो. अखेरीस माझ्याच शब्दात सांगायचं झालं तर, 'तुपात झळकते श्रद्धा, रव्यात खमंग भक्ती... साखरेत विरघळते नम्रता, केळीत मृदू प्रीती... नैवेद्य असतो देवाशी निःशब्द संवाद... जगणंही असो असंच प्रेमळ, पवित्र, समाधानी...'



# हे ६ पदार्थ देतात दुधा-पेक्षा जास्त कॅल्शियम!

मुंबई : आपण बहुतांशवेळा कॅल्शियम म्हटले की दुधाचा विचार करतो. खरं तर, बऱ्याच लोकांना वाटतं की कॅल्शियम मिळवण्यासाठी रोज दूध पिणं आवश्यक आहे. परंतु सत्य हे आहे की अनेक नैसर्गिक आणि फोर्टिफाइड अन्नपदार्थ असे आहेत जे दुधापेक्षा जास्त कॅल्शियम देतात. शरीराच्या हाडांची घनता, दातांचे आरोग्य आणि एकूणच शारीरिक विकासासाठी कॅल्शियम अत्यावश्यक आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ नुसार, प्रौढ व्यक्तीला दररोज सुमारे १००० मिलीग्राम कॅल्शियमची गरज असते. जाणून घ्या कोणते आहेत हे पदार्थ जे दूध न पिताही तुमची कॅल्शियमची गरज भागवतील: ....**(क्रमशः उद्याच्या अंकात)**

# खरेदीची लाट अन् दिवाळीची धूम

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जीएसटी कपातीचा निर्णय घेतल्यानंतर बाजारात उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण निर्माण झालेले दिसू लागले आहे. नवरात्रीत दिवाळी खरेदीसाठी जोरदार खरेदीची लाट उसळली होती. पण दिवाळीतही ही लाट कायम आहे आणि जीएसटी कपातीच्या रूपाने भारताला ही भेट मिळाली आहे असे समजले जात आहे. पण सर्वात जास्त फायदा ई कॉमर्सच्या व्यवसायाला आलेल्या झळाळीमुळे आहे. यंदाच्या दिवाळीमध्ये बाजारपेठांमध्ये अतिरिक्त उत्साह निर्माण झाला आहे. कारण ग्राहक लक्षणियरीत्या खर्च करत आहे आणि त्यांची क्रयशक्ती वाढली आहे.

त्यांच्या जोडीला जीएसटी कपात मदतीला आहे आणि कॉर्पोरेट कंपन्यांमध्येही कामगिरीने उत्साहाचे वातावरण आहे. सहसा कोणताही सणांचा उत्सव हा अर्थव्यवस्थेला चालना देणाराच असतो. तो प्रमुख आर्थिक कॅटलिस्टही असतो. त्यांचे अनेक घटक आहेत जसे की या काळात ग्राहकांची खरेदीचा उत्साह उतू जात असतो आणि खर्च अतोनात केला जातो. वास्तविक भारताची परिस्थिती आज काही वर्षापूर्वी होती तशी नाही. आज भारताचा ग्राहक खिशात बऱ्यापैकी पैसे घेऊन दुकानात जात असतो. महागड्या वस्तू खरेदी करत असतो. कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इडस्ट्रीजने सांगितले, की दिवाळी हे वाढीचा सर्वात महत्त्वाचा घटक असतो आणि ते यंदा दिसले आहे. दिवाळीच्या दिवसात सुवर्णाची खरेदी आणि गृहोपयोगी वस्तूंची खरेदी जोशात केली जाते. यंदाही ती लाट दिसते आहे. तसेच पारंपरिक आणि ऑनलाईन रिटेलर्सची विक्री वाढली आहे. यामुळे बाजारात खरेदीची धूम आणि ग्राहकांची अतोनात गर्दी दिसून येते. यंदा दिवाळीची खरेदी किती झाली ही आकडेवारी आज समोर नसली तरीही अगदी काही दिवसांत ती समोर येईल आणि ती रेकॉर्ड ब्रेक असेल असा अदाज आहे. फ्लिपकार्ट आणि ॲमेझॉन या ई-कॉमर्सच्या विशाल कंपन्यांकडे प्रचंड मागण्या आहेत आणि त्या पूर्ण करण्याच्या तयारीत आहेत.



वाढत्या किमती असूनही सोन्याच्या खरेदीला उत आला आहे. रिझर्व्ह बँकेने नवीन नियम घालून दिल्यानुसार सोने खरेदी आणि सोन्यावर कर्ज मिळवणे सोपे झाले आहे ही ग्राहकांच्या समाधानाची बाब आहे.

दिवाळी हा सण संपत्ती निर्मिती आणि व्यापारी आकार वाढवण्यासाठी शुभ समजला जात असल्याने गुंतवणूकदारांसाठी हा सण उत्साहाने भारलेला असतो. त्या दृष्टीने मोदी सरकारने आल्यापासून जनतेला एकापेक्षा एक भेटी देण्याचे ठरवले आहे आणि त्यापैकीच आहे जीएसटी कपात. जी एसटी कपातीमुळे ग्राहकांच्या खिशातील बराचसा पैसा वाचला असून तो आपोआपच बाजारात ओतला जात आहे. जीएसटी २.० मुळे अनेक वस्तूंच्या किमती जनतेच्या आवाक्यात आल्या आहेत आणि आयकर सुधारणांमुळे उपभोग आणि खासगी भांडवली खर्च आटोक्यात आला आहे. दिवाळी खरेदीमुळे किरकोळ विक्री वाढते आणि उत्पादनाला चालना मिळते आणि अर्थव्यवस्थेत मोठी उलाढाल होते. हा आतापर्यंतचा अनुभव आहे. यंदाच्या दिवाळीच्या उत्साहात ग्राहक कपडे, इलेक्ट्रॉनिक्स आणि घरगुती वस्तूंच्या खरेदीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला गेला आहे. हे दिसतेच. या काळात मागणी वाढल्यामुळे कंपन्यांना अधिक उत्पादन करावे लागते आणि त्यामुळे उत्पादनाला चालना मिळून रोजगार निर्मिती जोरदार होते. त्यात यंदा जीएसटी कपातीचा शॉक नसल्यामुळे किंवा बराचसा कमी झाल्यामुळे ग्राहकांच्या खिशात पैसा अधिक वाजू लागला आहे. दिवाळीमुळे कर महसुलात वाढ ही चांगलीच होते आणि ही बाब आर्थिक वाढीसाठी उत्साहवर्धक असते.

दिवाळी हा केवळ प्रकाशाचा सण नाही तर अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही तो एक प्रकाशमान सण आहे. हा सण अर्थव्यवस्थेला चालना देणारा आहे. त्यामुळे भारतात ग्राहकांच्या संख्येत अविश्वसनीय वाढ झाली आहे. यंदाच्या दिवाळीत ४ ते ४.२५ कोटी लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. २०१९ पासून ते २०२५ पर्यंत दिवाळीच्य ग्राहकांनी केलेल्या खर्चात अनपेक्षित वाढ झाली आहे. २०२४ मध्ये तो दिवाळीला ४.२५ लाख कोटी होता. यंदा तो यापेक्षाही अधिक असण्याची अपेक्षा आहे. यंदा बरेच ग्राहक ऑनलाईन खरेदीकडे वळल्याने ई कॉमर्सच्या व्यवसायात प्रचंड वाढ झाली आहे आणि २०१९ मध्ये ३५ हजार कोटी रुपयांवरून ई कॉमर्सचे मूल्य १.२ लाख कोटी रुपयांपर्यंत गेले आहे.

दिवाळी खरेदीसाठी रस्ते ओसंडून वाहत आहेत आणि नेहमीप्रमाणे वाहतूक कोंडी होऊ लागलीय. पण सोने खरेदीसाठी याच काळात ग्राहकांची झुंबड उडते. यंदा सोन्याची विशेषतः खरेदी विक्रमी झाली ती आहे ती एक लाख कोटी रुपये. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात यंदा २५ टक्के वाढ झाली आहे. एकाच दिवशी एक लाख कोटी रुपयांची विक्री ही सोन्याचा उच्चांक तर आहेच पण तो विक्रमी आहे. तितकीच चांदीची विक्रीही झाली आहे. सोन्याकडे ग्राहकांचा कल वाढतो आहे आणि त्यामुळे सोन्याच्या खरेदीत वाढ होणे साहजिक आहे. दिवाळी हा सण शुभ मानला जातो आणि त्यामुळे पारंपरिक उत्साहात जाऊन लोक खरेदी करत असतात. दिवाळीच्या दिवशी सर्वच व्यवसायांसाठी तेजीचे दिवस असतात आणि त्यमुळे ग्राहकांच्या खिशात पैसा ओसंडून वाहत असतो.

त्यामुळे यंदा बाजारात ग्राहकांची रेलचेल दिसत आहे. संपूर्ण देशभरातील आकडेवारी नाही तरी जी आकडेवारी आहे ती प्रातिनिधिक म्हणावी लागेल. त्यानुसार ही सोन्याचांदीच्या वस्तुंच्या विक्री झाली ती ६० हजार कोटी रुपये तर किचन घरगुती वापराच्या वस्तूंची विक्री झाली ती १५ हजार कोटी रुपये. इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तूंची विक्री पोहोचली ती यंदा १० हजार कोटी रुपये. मेवा मिठाईची विक्री झाली ती १२ हजार कोटी रुपये. यावरून ग्राहकांची पोझिशन कळते आणि त्यावरून हा निष्कर्ष निघतो की दिवाळी असो की सणासुदीचे दिवस असो ती इलेक्शन, भारतीय अर्थव्यवस्थेसाठी हे इंजिन्स आहेत.

## सखी : मासिक पाळी



## डॉक्टर टीप्स



यापुढेही समाजात मासिक पाळीविषयी अधिक प्रसार होणे गरजेचे आहे. त्यामुळे समाजात अधिक सकारात्मक वातावरण निर्माण होईल,' असं ती सांगते.

ठाण्यात सखी ही संस्था शालेय विद्यार्थ्यांना मासिक पाळीविषयी माहिती देण्याचं काम करत आहे. 'या विद्यार्थ्यांना मासिक पाळीमुळे स्त्रियांच्या आयुष्यात होणाऱ्या बदलांची माहितीही देण्यात येते. त्याचबरोबर तज्ज्ञांच्या मदतीने या विषयाबद्दल मुलींसोबत मनमोकळा संवाद साधण्यात येतो. त्यामुळे मासिक पाळी हा गंभीर विषय मुलांना समजण्यास अधिक सोपा जातो. तसेच त्यांना योग्य वयात योग्य माहिती मिळते,' असे या संस्थेच्या डॉ. लता घनशामनी यांनी सांगितले.

सध्या मासिक पाळीविषयी जागरूकता निर्माण करणारे विविध चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. अशा विविध चित्रपटांद्वारे मासिक पाळीविषयीचा समाजातील लाजरेपणा कमी झाला आहे.

## विनोद




अरुण : कोंबडीला तू गरमागरम पाण्याने आंघोळ का घालतेस रोज रोज?

वरुण : तिने उकडलेले अंडे द्यावे म्हणून.

## संदेश

tere husn ki tapish jala na de mujhe,

tu kar mahobbat mujh se jara ahista ahista.

## सुविचार

**सुखी होण्यासाठी सुखी होण्याचा मार्ग म्हणजे निसर्गावर, नियतीवर...परमेश्वरावर कोणावर तरी विश्वास ठेवा!**




**संस्कृत सुभाषित**

**अज्ञश्चाश्रद्धानश्च संशयात्मा विनश्यति**
**नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मन :।।**
**(भीष्मपर्व, अध्याय २८, ४० महाभारत)**

**अर्थ :** अज्ञ असून श्रद्धा न ठेवणारा असा संशयखोर मनुष्य सर्वथा नाश पावतो, अशा संशयात्म्याला ना इहलोक, ना परलोक, ना सुख.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. हत्तीवरीक बैठक
३. गरजू
७. हुक्की, लहर
१०. पाणी
११. जाणूनबुजून
१२. माणशी प्रमाण
१४. पाठवणी
१६. नकला करणारा
१७. मालक
१८. एक धान्यप्रकार, गहू-हरभरा डाळीचे एकत्र पीठ-त्याचे शिजवलेले पौष्टिक मिश्रण
१९. हात
२०. वेळ, अवधी
२१. शेतमळ्यांचा मालक
२४. म्हातारपण व मृत्यू नसलेला
२७. एक लाल कंदमूळ
२९. तळे
३१. प्रतिकूल स्थितीत झालेली पांगापांग
३४. बडबड
३७. किराणा व्यापारी
३८. वेल
४०. तड लागेपर्यंत (जेवणे)
४१. वर्ष, साल
४२. खंदक
४३. लक्ष्मीचे एक नाव
४५. बैलाच्या मानेवरील जोखड
४६. घट्ट बासुंदी
४८. पार्थिवावरचे वस्त्र
५०. नूतन, नवे
५२. श्वसनाचा अवयव
५३. लाकडाची एक उत्कृष्ट जात
५५. भांडण सोडवणारा मध्यस्थ
५७. जीभ
५९. दोन कानांचे तळण्याचे पात्र
६१. येरझार
६४. पार्वतीचे नाव
६५. पोते
६८. दिलेला ठराविक काळ
६९. दुःख (हिंदी)
७०. प्रत्येक वर्षी
७१. बगीचा
७३. छोटी घागर
७५. बायको
७६. निमंत्रक (स्त्री)
७९. कच्चे लिखाण (इंग्रजी)
८१. रांग, पंक्ती
८२. घर
८३. वृक्षाच्या आधाराने वाढणारी
८४. उदर
८५. धपाटा
८६. मरुणझुणुच्या ---, जा रे माझ्या माहेराफ
८८. जमिनीखाली येणारे फळ
८९. निराळा
९०. छोटे कुबड
९१. फालतू सामान

### उभे शब्द

१. काजळ
२. लहान मूल
३. विश्वासघातकी
४. दारूचा प्रकार
५. नमनीय
६. छोटी होडी
७. सखी, मैत्रिण
८. करणी, उपद्व्याप (हिंदी)
९. माळी
११. ठेकेदार
१३. अक्कलहुशारीने वागणारा
१५. सिंहाचे भारतातील अभयारण्य येथे आहे
१७. धमकी, घातलेली भीती
१८. मलई
२२. हवेतील थंडावा
२३. औदार्य, देण्याची वृत्ती
२५. कमळ
२६. रममाण, गुंग
२७. बेसावध
२८. अभयदान
३०. भांडणे लावणे
३२. घाई, त्वरा
३३. शंकर
३४. धाक, भीती
३५. आवरण
३६. रोखलेली नजर
३९. तारणारा
४४. अंत:करण
४७. संताप
४९. नवीन आलेला
५१. मऊ
५२. विविध
५३. शिर्डीचे संत
५४. वचन, मुदतविषयीचा करार
५६. दीर्घ श्वास
५८. कायदेशीर
५९. जास्तीत जास्त
६०. गट, लोकांचा समूह
६२. फणा काढणारा सर्प
६३. रहस्य
६४. सोडलेला श्वास
६६. उबदार पांघरुण (इंग्रजी)
६७. दृष्टीभेट
७२. बाणेदार
७४. लाटण्याचा साथीदार
७५. न्याय, प्रशंसा
७७. ढग (संस्कृत)
७८. आई
८०. अंतर, तफावत
८२. सोन्या-चांदीचा व्यापारी
८४. बैलाचा सण
८७. आवाजातील घोगरेपणा

### आडवे उत्तर

१.अंबारी ३.गरजवंत ७.सणक १०.जल ११.मुद्दाम १२.दरडोई १४.रवानगी १६.नकलाकार १७.धनी १८.सातू १९.कर २०.समय २१.बागायतदार २४.अजरामर २७.गाजर २९.तलाव ३१.वाताहत ३४.वटवट ३७.वाणी ३८.लता ४०.तट्ट ४१.सन ४२.चर ४३.कमला ४५.जू ४६.रबडी ४८.कफन ५०.नवीन ५२.नाक ५३.सागवान ५५.लवाद ५७.रसना ५९.कढई ६१.गमनागमन ६४.उमा ६५.बारदान ६८.मुदत ६९.गम ७०.दरसाल ७१.बाग ७३.कळशी ७५.दारा ७६.यजमानीण ७९.रफ ८१.बाग ८२.सदन ८३.लता ८४.पोट ८५.रट्टा ८६.पाखरा ८८.कंद ८९.वेगळा ९०.पोक ९१.सटरफटर

### उभे उत्तर

१.अंजन २.बालक ३.गद्दार ४.रम ५.वंदनीय ६.तर ७.सई ८.करतूत ९.बनकर ११.मुकादम १३.डोकेबाज १५.गीर २३.दानत २५.राजीव २६.रत २७.गाफील २८.जीवनदान ३०.लावालावी ३२.तातडी ३३.हट्ट ३४.वचक ३५.टरफल ३६.टक ...गीत ५१.नरम ५२.नाना ५३.साईबाबा ५४.वायदा ५६.दम ५८.समदशीर ५९.कमाल ६०.समुदाय ६२.नाग ६३.गमक ७२.मानी ७४.पोळपाट ७५.दाद ७७.जलद ७८.माता ८०.फरक ८२.सराफ ८४.पोळा ८७.खर



# क्रीडा विश्व





फिलीपिन्समधील लागुना येथे व्हॉलीबॉल वर्ल्ड बीच प्रो टूर सामन्यात भाग घेताना स्पेन आणि इटलीचे खेळाडू.

## थोडक्यात/ संक्षिप्त

### रोहित– विराट– गिलचा फ्लॉप शो! वनडे क्रिकेटमध्ये नोंदवला नकोसा विक्रम

दिल्ली–भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला वनडे सामना



भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी अतिशय खास आहे. कारण गेल्या ८ महिन्यांपासून विराट कोहली आणि रोहित शर्माची जोडी क्रिकेटपासून दूर होती. ही जोडी आपला पहिला वनडे सामना खेळण्यासाठी मैदानात उतरली. चाहत्यांना या दोघांकडून मोठ्या खेळीची अपेक्षा होती. पण ही जोडी असं करू शकलेली नाही. विराट– रोहितची जोडी स्वस्तात माघारी परतली. त्यानंतर कर्णधार शुबमन गिलदेखील स्वस्तात माघारी परतला. यासह या तिन्ही फलंदाजांच्या नावे नकोसा विक्रम नोंदवला गेला आहे.हा सामना भारतीय वनडे संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मसाठी अतिशय खास होता, कारण हा त्याच्या क्रिकेट कारकिर्दीतील ५०० वा आंतरराष्ट्रीय सामना होता. पण ५०० व्या सामन्यात त्याला हवी तशी कामगिरी करता आली नाही. पर्थच्या वेगवान उसळी घेणाऱ्या खेळपट्टीवर रोहित अवघ्या ८ धावा करत माघारी परतला.

***

### ९ रन्सवर ४ विकेट, ऑस्ट्रेलियाची टिच्चून गोलंदाजी, भारताची सपशेल शरणागती

दिल्ली–पर्थमध्ये सूरू असलेल्या पहिल्या वनडे सामन्यात ऑस्ट्रेलियाच्या वेगवान गोलंदाजांनी भारतीय फलंदाजांची दाणादाण उडवली आहे. खरं तर पावसामुळेच हा खेळ अनेकदा थांबला, त्यामुळे २६ ओव्हरचा सामना झाला. यामध्ये टीम इंडियाने फक्त १३६ धावाच करू शकली.त्यातल्या त्यात भारत शेवटच्या ९ धावा काढताना ४ विकेट गमावून बसला होता.पण नितीश रेड्डीमुळे भारताला ऑल आऊटचा धोका टळला.ऑस्ट्रेलियाने टॉस जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला होता.त्यामुळे टीम इंडिया प्रथम फलंदाजीला उतरली होती.टीम इंडियाची सुरूवात खूपच खराब झाली होती. कारण ७ महिन्यांनी मैदानात वापसी करणारा रोहित शर्मा अवघ्या ८ धावांवर बाद झाला. त्याच्या मागोमाग विराट कोहली मैदानात आला. पण तो देशील शून्य धावांवर बाद झाला. त्याच्यानंतर कर्णधार शुभमन गिल १० धावांवर बाद झाला. तीन महत्वाचे विकेट पडल्यानंतर श्रेयस अय्यर आणि अक्षर पटेलने डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना मोठ्या धावा करता आल्या नाही.श्रेयस अय्यर ११वर गेला. तर अक्षरने ३१ धावा केल्या. वॉशिंग्टन सुंदर १० धावांवर बाद झाला. सुंदर ज्यावेळेस बाद झाला तेव्हा भारताच्या ११५ धावांवर ७ विकेट होत्या.

***

### टीम इंडियाने १३६ धावांवर भूईसपाट,

दिल्ली,१९ ऑक्टोबर–वेस्ट इंडिजविरुद्ध टेस्ट मालिका जिंकल्यानंतर आता तब्बल सात महिन्यानंतर टीम इंडिया वनडे सामना खेळत आहे. पर्थवर सुरू असलेल्या या सामन्यात टीम इंडियाने २६ ओव्हरमध्ये १३६ धावा केल्या आहेत. पावसाने सतत हजेरी लावल्याने टीम इंडियाला फक्त २६ ओव्हरपर्यत बॅटिंग करता आली. तर ऑस्ट्रेलियाला आता विजयासाठी ींए मुळे २६ ओव्हरमध्ये १३१ धावा करायच्या आहेत. अशातच आता पावसाने पुन्हा खोडा घातला तर ऑस्ट्रेलियाचं टेन्शन वाढणार आहे.

केएल राहुलने ३८ धावांची खेळी–टीम इंडियाची सुरूवात खराब झाली. रोहित शर्मा आणि विराट कोहली झटपट बाद झाले. त्यानंतर कॅप्टन शुभमन गिल देखील लगेच बाद झाला. श्रेयस अय्यरने पाय रोवण्याचा प्रयत्न केला. पण पावसाने सतत अडथळा आणल्यानंतर श्रेयसची विकेट गेली. त्यानंतर केएल राहुलने कडवी झुंड दिली अन् आक्रमक फलंदाजी केली. केएल राहुलने ३८ धावांची खेळी केली. तर अक्षर पटेलने ३१ धावांची खेळी केली. अखेरीस नितीश कुमार रेड्डीने १९ धावांची खेळी केली. अखेरच्या चार ओव्हरमध्ये टीम इंडियाने ३० धावा केल्या. त्यामुळे समाधानकारक टार्गेट देता आलंय.तीन पेस बॉलर्स–टीम इंडियाच्या स्कॉडमध्ये तीन पेस बॉलर्स आहेत. हर्षित राणा, मोहम्मद सिराज आणि अर्शदीप सिंग यांच्यावर टीम इंडियाची मदार असणार आहेत.

***

### पाऊसही भारताला वाचवू शकला नाही

पर्थ–भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया यांच्यात १९ ऑक्टोबर पासून वनडे सीरिजला सुरुवात झाली. पहिला सामना पर्थ स्टेडियमवर खेळवण्यात आला. मात्र या सामन्यात टीम इंडियाचा ७ विकेट्सने पराभव झाला असून ऑस्ट्रेलियाने तीन सामन्यांची सीरिजमध्ये १–० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात बऱ्याचदा पावसामुळे अडथळा आला परिणामी हा वनडे सामना २६ ओव्हरचा खेळणार असे निश्चित झाले. त्यानंतर थए मेथडमुळे ऑस्ट्रेलियाला देण्यात आलेलं विजयाचं टार्गेट सुद्धा कमी होऊन १३१ धावांचं झालं. ऑस्ट्रेलियाने अखेर हे आव्हान पूर्ण केलं आणि सामना जिंकला.

फलंदाजीत फ्लॉप ठरली टीम इंडिया : ऑस्ट्रेलियाने टॉस जिंकून आधी गोलंदाजीचा निर्णय घेतला त्यामुळे टीम इंडियाला फलंदाजीसाठी मैदानात यावं लागलं. पावसाच्या अडथळ्यामुळे ५० ओव्हरचा वनडे सामना हा अवघ्या २६ ओव्हरचा करण्यात आला. टीम इंडियाने २६ ओव्हरमध्ये ९ विकेट गमावून १३६ धावा केल्या. ८

## इंग्लंडने भारताच्या विजयाचा घास हिरावला, वर्ल्डकपमध्ये सलग तिसरा पराभव

इंदोर: इंदोरच्या मैदानावर आज भारतीय महिला संघाला इंग्लंडच्या महिला संघाकडून पराभवाचा सामना करावा लागला. आयसीसी महिला क्रिकेट वर्ल्डकपमध्ये भारतीय महिला संघाचा हा सलग तिसरा पराभव आहे. आधी द. आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडविरुद्ध त्यांना पराभवाचा सामना करावा लागल्याने त्यांचे सेमीफायनलमध्ये जाणे अनिश्चित मानले जात आहे.

इंदोरच्या होळकर स्टेडियमवर आज झालेल्या आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक २०२५ स्पर्धेतील २० व्या सामन्यात इंग्लंडने यजमान भारताचा ४ धावांनी थरारक पराभव करत उपांत्य फेरीतील आपले स्थान निश्चित केले.

इंग्लंडची दमदार फलंदाजी आणि कर्णधार नाईटचे शतक

टॉस जिंकून प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडच्या संघाने कर्णधार हीथर नाईटनेकेलेल्या शानदार शतकाच्या (१०९ धावा, ९१ चेंडू) जोरावर ५० षटकांत ८ गडी गमावून २८८ धावांचे मोठे आव्हान उभारले. नाईटने तिच्या ३०० व्या आंतरराष्ट्रीय सामन्यात आपले तिसरे एकदिवसीय शतक झळकावले. सलामीवीर



एमी जोन्सनेही ५६ धावांची अर्धशतकीय खेळी केली.

भारताकडून अनुभवी फिरकीपटू दीप्ती शर्मानेे शानदार गोलंदाजी करत ४ गडी बाद केले (४/५१). तिच्या या कामगिरीमुळेच इंग्लंडला शेवटच्या षटकांमध्ये मोठी धावसंख्या करण्यापासून रोखता आले. दीप्तीने याच सामन्यात आपला १५० वा एकदिवसीय बळीही घेतला.

भारताची कडवी झुंज पण विजयापासून वंचित

२८९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय महिला संघाने कर्णधार हरमनप्रीत कौर (७० धावा) आणि उपकर्णधार स्मृती मंधाना (८८ धावा) यांच्या दमदार अर्धशतकांच्या जोरावर कडवी झुंज दिली. हरमनप्रीत आणि स्मृती यांनी तिसऱ्या गड्यासाठी १६७ धावांची मोठी भागीदारी करत भारताला विजयाच्या मार्गावर आणले होते.

अंतिम क्षणी सामना फिरला

या दोन मोठ्या फलंदाजांच्या विकेट्सनंतर भारताची धावगती मंदावली. दीप्ती शर्माने (४१ धावा) एकाकी लढत दिली आणि ती क्रीझवर असताना भारताला विजयासाठी ३० चेंडूंमध्ये ३६ धावांची गरज होती, परंतु रिचा घोष (८ धावा) आणि त्यानंतर आलेल्या खेळाडूंना आवश्यक गतीने धावा करता आल्या नाहीत. दीप्ती शर्मादेखील ५० धावा पूर्ण करून बाद झाली.

शेवटच्या षटकात भारताला विजयासाठी १६ धावांची आवश्यकता होती. लिन्सी स्मिथच्या गोलंदाजीवर भारतीय खेळाडूंना अपेक्षित धावा करता आल्या नाहीत आणि इंग्लंडने हा सामना ४ धावांनी जिंकून

## रोहित, विराटकडून निराशा; पहिल्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून भारताचा पराभव

**पर्थ**–रोहित शर्मा आणि विराट कोहली या माजी कर्णधारांचे बहुचर्चित आंतरराष्ट्रीय पुनरागमन अपयशी ठरले. हे दोघे मिळून केवळ २२ चेंडूच खेळपट्टीवर टिकू शकले. त्यातच अन्य फलंदाजांनीही निराशाजनक कामगिरी केल्यामुळे पावसाच्या व्यत्ययात संपन्न झालेल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात भारताला यजमान ऑस्ट्रेलियाकडून पराभव पत्करावा लागला. ऑस्ट्रेलियाने डकवर्थ–लुईस–स्टर्न नियम ानुसार सात गडी राखून सरशी साधताना तीन सामन्यांच्या या मालिकेत १–० अशी आघाडी मिळवली.

पश्चिम ऑस्ट्रेलियातील पर्थ शहर उष्ण हवामानासाठी ओळखले जाते. मात्र, रविवारी याच शहरात झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात पावसाने सातत्याने व्यत्यय आणला. चार वेळा खेळ थांबवावा लागला. यात बराच वेळ वाया गेल्याने अखेर सामना २६–२६ षटकांचा करण्यात आला. यात भारताने प्रथम ९ बाद १३६ अशी धावसंख्या उभारली. पंचांनी षटके कमी करण्यापूर्वीच भारताने चार गडी गमावले होते. त्यामुळे डकवर्थ–लुईस–स्टर्न नियमानुसार ऑस्ट्रेलियासमोर १३१ धावांचे सुधारित लक्ष्य ठेवण्यात आले. कर्णधार मिचेल मार्श (५२ चेंडूंत नाबाद ४६) आणि जोश फिलिपे (२९ चेंडूंत ३७) यांच्या योगदानामुळे ऑस्ट्रेलियाने २१.१ षटकांतच हे आव्हान पार करताना मालिकेची विजयी सुरुवात केली.

डढजठखएड धजण चअध ङखघए

पाकिस्तानकडून 'आयसीसी'च्या वक्तव्याचा निषेध; कोणतीही शहानिशा न करता अफगाणिस्तानची बाजू घेतल्याचा आरोप

गाझामधील शांतता धोक्यात; इस्रायलकडून हमासवर हल्ले

त्याआधी, ऑप्टस स्टेडियमची अतिरिक्त उसळी असणारी खेळपट्टी आणि ढगाळ वातावरण याचा विचार करून ऑस्ट्रेलियाचा कर्णधार मार्शने नाणेफेक जिंकून अपेक्षेप्रमाणे भारताला फलंदाजीचे आमंत्रण दिले. सर्वाच्या नजरा रोहित



आणि विराट या तारांकितांच्या पुनरागमनाकडे होत्या. हे दोघेही पाच महिन्यांनी आंतरराष्ट्रीय सामना खेळत होते. भारताच्या डावाची सुरुवात करण्यासाठी रोहित मैदानात उतरताच स्टेडियममध्ये उपस्थित चाहत्यांनी त्याच्या नावाचा जयघोष केला. बऱ्याच महिन्यांनी स्पर्धात्मक सामना खेळत असल्याने रोहित सुरुवातीला चाचपडताना दिसला. विशेषत: जोश हेझलवूडने आखूड टप्प्यावर चेंडू टाकत रोहितची कसोटी पाहिली. रोहितने एक चौकार लगावला, पण चाहत्यांचा आनंद तेवढ्यापुरताच मर्यादित राहिला. हेझलवूडच्या एका उसळलेल्या चेंडूने रोहितच्या बॅटची कड घेतली आणि दुसऱ्या स्लीपवर उभ्या मॅथ्यू रेनशॉने त्याचा झेल टिपला. रोहितला १४ चेंडू खेळून केवळ ८ धावा करता आल्या. त्यानंतर केएल राहुल (३१ चेंडूंत ३८), अक्षर पटेल (३८ चेंडूंत ३१) आणि पदार्पणवीर नितीश कुमार रेड्डी (११ चेंडूंत नाबाद १९) यांनी आक्रमक शैलीत खेळताना भारताला ९ बाद १३६ धावांपर्यंत पोहोचवले.

सुधारित १३१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाने ट्रॅव्हिस हेड (८) आणि मॅथ्यू शॉर्ट (८) यांना झटपट गमावले. अर्शदीप सिंगने हेड, तर अक्षरने शॉर्टला बाद करत भारताच्या आशा पल्लवित केल्या. मात्र, मार्श आणि फिलिपे यांनी तिसऱ्या गड्यासाठी ५५ धावांची भागीदारी रचत ऑस्ट्रेलियाला भक्कम स्थितीत नेले. मग मार्शने रेनशॉच्या (२४ चेंडूंत नाबाद २१) साथीने ऑस्ट्रेलियाच्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

संक्षिप्त धावफलक

भारत : २६ षटकांत ९ बाद १३६ (केएल राहुल ३८, अक्षर पटेल ३१; जोश हेझलवूड २/२०, मिचेल ओव्हेन २/२०, मॅथ्यू कुनमन २/२६) पराभूत वि. ऑस्ट्रेलिया : २१.१ षटकांत ३ बाद १३१ (मिचेल मार्श नाबाद ४६, जोश फिलिपे ३७; वॉशिंग्टन सुंदर १/१४, अक्षर पटेल १/१९)

सामनावीर : मिचेल मार्श

५आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये रोहित शर्माचा हा ५००वा सामना होता. अशी कामगिरी करणारा तो भारताचा पाचवा खेळाडू ठरला. याआधी सचिन तेंडुलकर (६६४), विराट कोहली (५५१), महेंद्रसिंह धोनी (५३५) आणि राहुल द्रविड (५०४) यांनी अशी कामगिरी केली आहे.

१ऑस्ट्रेलियातील एकदिवसीय सामन्यात कोहली प्रथमच खातेही न उघडता बाद झाला. याआधी ऑस्ट्रेलियात खेळलेल्या २९ एकदिवसीय डावांत त्याने पाच शतके आणि सहा अर्धशतकांसह १३२७ धावा केल्या होत्या.

१८ ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारताचे रोहित शर्मा, शुभमन गिल आणि विराट कोहली हे अव्वल तीन फलंदाज १८ धावांतच तंबूत परतले. २०१९ सालच्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील न्यूझीलंडविरुद्धच्या उपांत्य सामन्यानंतर भारताचे अव्वल तीन फलंदाज इतक्या कमी धावांत गारद होण्याची ही पहिली वेळ ठरली. त्यावेळी भारताने पहिले तीन फलंदाज तीन धावांत गमावले होते.

'पॉवर–प्ले'मध्ये तीन फलंदाज गमावल्यानंतर पुनरागमन करणे अवघड जाते. आम्हाला या सामन्यातून बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या. केवळ १३१ धावा वाचवतानाही आम्ही ऑस्ट्रेलियाला झुंज दिली ही आमच्यासाठी सकारात्मक बाब होती. – शुभमन गिल, भारताचा कर्णधार.

## निवृत्तीनंतर लंडनमध्येच राहण्याच्या निर्णयावर कोहलीने सोडले मौन





कॅनबेरा : भारतीय संघाचा फलंदाज विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर लंडनमध्येच का राहण्याचा निर्णय घेतला याबद्दलचे मौन सोडले आहे. कोहली सात महिन्यांनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतला आहे. दरम्यान, मे महिन्यात कोहली कसोटी क्रिकेटमधून निवृत्त झाला. त्यावेळी तो आयपीएलमध्ये खेळत होता आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने विजेतेपद जिंकल्यानंतर तो आपल्या कुटुंबासह लंडनला गेला. कोहलीने बराच ब्रेक घेतला. विराट कोहलीने एका मुलाखतीत खुलासा केला की, कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्याने त्याला घरी जास्त वेळ घालवता आला आणि त्याच्या वैयक्तिक आयुष्यावर लक्ष केंद्रित करता आले. गेल्या १५ वर्षांत त्याला आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यापासून योग्य विश्रांती मिळाली नाही आणि तो त्याच्या पत्नी आणि दोन मुलांसोबत काही वेळ घालवण्यास आनंदी होता. कोहली म्हणाला, हो, मी कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होऊन बराच काळ लोटला आहे आणि मी म्हटल्याप्रमाणे, मी पुन्हा एकदा आयुष्याच्या नव्या जोमात परतत आहे. इतक्या वर्षांपासून मी ते करू शकलो नाही. माझ्या मुलांसोबत आणि कुटुंबासोबत घरी दर्जेदार वेळ घालवणे हा खरोखरच एक अद्भुत काळ होता, जो मी खरोखरच अनुभवला आहे. खरे सांगायचे तर, गेल्या १५–२० वर्षांत मी जितक्या क्रिकेटमध्ये खेळलो आहे, त्यात मी क्वचितच मोठा ब्रेक घेतला आहे. जर तुम्ही आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि आयपीएल एकत्र केले तर, गेल्या १५ वर्षांत मी कदाचित इतर कोणापेक्षा जास्त सामने खेळलो आहे. त्यामुळे, हा ब्रेक माझ्यासाठी खरोखरच ताजेतवाने ठरला आहे. २२४ दिवसांनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये परतताना, कोहली अपयशी ठरला आणि त्याचे खाते न उघडताच बाद झाला. कोहलीला मिशेल स्टार्कच्या चेंडूवर कोनोलीने झेल दिला. रोहित आणि कोहलीच्या



स्लोव्हेनियातील लुब्लियाना येथे झालेल्या आइस हॉकी लीग सामन्यात भाग घेताना एचके ऑलिंपिज आणि ईसी रेड बुल साल्झबर्गचे खेळाडू.

## पावसाचा व्यत्यय आणि स्टार फलंदाजांचा फ्लॉप शो चर्चेत

पर्थ : भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना पर्थ येथे झाला. हा सामना ऑस्ट्रेलियाने सात विकेट राखून जिंकला. पावसाचा वारंवार आलेला व्यत्यय आणि भारताच्या स्टार फलंदाजांचा फ्लॉप शो यामुळे या सामन्याची सोशल मीडियात भरपूर चर्चा सुरू आहे. नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेणे ऑस्ट्रेलियासाठी या सामन्यात फायद्याचे ठरले आहे.

वारंवार पावसाचा व्यत्यय आल्यामुळे पर्थमध्ये ५० ऐवजी कमी षटकांचा सामना खेळवण्याचा निर्णय झाला. भारताने दिलेल्या आव्हानाचा



पाठलाग करताना डकवर्थ लुईस नियमानुसार ऑस्ट्रेलियाने २१.१ षटकांत तीन विकेट गमावून १३१ धावा केल्या आणि सामना सात विकेट राखून जिंकला.ऑस्ट्रेलियाकडून मिचेल मार्शने नाबाद ४६ धावा केल्या. ट्रॅव्हिस हेड आणि मॅथ्यू शॉर्ट हे दोघे प्रत्येकी आठ धावा करुन बाद झाले. जोश फिलिप ३७ धावा करुन बाद झाला. मॅट रेनशॉने नाबाद २१ धावा केल्या. भारताकडून अर्शदीप सिंह, अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदरने प्रत्येकी एक बळी घेतला. याआधी भारताने २६ षटकांत नऊ बाद १३६ धावा केल्या. भारताचे स्टार फलंदाज असलेले रोहित शर्मा, विराट कोहली, शुभमन गिल हे पुरते अपयशी ठरले. रोहित शर्माने ८, शुभमन गिलने १०, विराट कोहलीने शून्य, श्रेयस अय्यरने ११, अक्षर पटेलने ३१, केएल राहुलने ३८, वॉशिंग्टन सुंदरने १०, नितीश रेड्डीने नाबाद १९, हर्षित राणाने एक, अर्शदीप सिंहने शून्य (धावचीत), मोहम्मद सिराजने नाबाद शून्य धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून हेझलवूड, ओवेन

## भारताने १३६ धावा केल्या पण..ऑस्ट्रेलियाला का मिळाले १३१ धावांचे लक्ष्य?



**दिल्ली**–बहुप्रतिक्षित अशा भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील वनडे मालिकेला आज १९ ऑक्टोबरपासून सुरूवात झाली आहे. रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या पुनरागमनामुळे या मालिकेची सर्वाधिक चर्चा आहे. पण रोहित–विराट पहिल्याच सामन्यात अपयशी ठरत लवकर माघारी परतले. याशिवाय भारताच्या डावात पावसाने व्यत्यत आणल्याने अखेरीस सामना २६ षटकांचा करण्यात आला. यासह भारताने प्रथम फलंदाजी करताना १३६ धावा केल्या, पण ऑस्ट्रेलियाला विजयासाठी १३१ धावांचे लक्ष्य का देण्यात आले, जाणून घेऊया.

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला वनडे सामना पर्थमध्ये खेळवला जात आहे. पावसाची सातत्याने हजेरी असलेल्या या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाविरुद्ध २६ षटकांत ९ बाद १३६ धावा केल्या, परंतु यजमान संघाला १३१ धावांचे लक्ष्य देण्यात आले.


भारतीय संघाची सुरूवात या सामन्यात खूपच खराब झाली. भारताने २५ धावांत रोहित, विराट आणि गिलच्या रूपात ३ मोठे विकेट गमावले. पावसाच्या हजेरीमुळे पर्थमधील सामना तिसऱ्यांदा थांबवण्यात आला. तिसऱ्यांदा जेव्हा पावसामुळे खेळ थांबला तेव्हा भारत १६.४ षटकांत ४ बाद ५२ धावांवर होता. यानंर सामना सुरू झाल्यानंतर सामन्याची षटकं २६ षटकांपर्यत कमी करण्यात आली.

२६ षटकांचा सामना झाल्यानंतर अक्षर पटेल (३८ चेंडूत ३१) आणि केएल राहुल (३१ चेंडूत ३८) यांनी भारतीय डावाला गती दिली आणि संघाला खराब सुरुवातीनंतर सावरण्यास मदत केली. पदार्पण करणाऱ्या नितीश कुमार रेड्डीने (११ चेंडूत नाबाद १९) अखेरीस दोन षटकार लगावत चांगली फलंदाजी केली आणि भारताला १३६ धावांपर्यंत नेलं.

भारताने केल्या १३६ धावा, पण ऑस्ट्रेलियाला मिळालं १३१ धावांचं लक्ष्य, कसं काय?

भारताने १३६ धावा केल्या असूनही ऑस्ट्रेलियाला डकवर्थ–लुईस–स्टर्न (डीएलएस) पद्धतीमुळे १३१ धावांचे लक्ष्य देण्यात आले. भारतीय संघाची सुरुवात खराब झाली आणि त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागले. डावात सुरुवातीला सलग विकेट्स गम

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने सर्वसमावेशक प्रवासासाठी सोलापूर आणि कलबुरगि स्थानकांवर ब्रेल नकाशे बसवले



**सोलापूर/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने सर्वसमावेशकता आणि प्रवासी-अनुकूल सेवांना प्रोत्साहन देण्यासाठी सोलापूर आणि कलबुरगि रेल्वे स्थानकांवर ब्रेल नकाशे बसवले आहेत. दृष्टीदोष असलेल्या प्रवाशांसाठी सुलभ आणि अडथळामुक्त वातावरण निर्माण करण्याच्या भारतीय रेल्वेच्या सततच्या प्रयत्नांचा हा एक भाग आहे.

दृष्टिहीन प्रवाशांना बुकिंग काउंटर, वेटिंग हॉल, प्लॅटफॉर्म, शौचालये, फूट ओव्हर ब्रिज आणि लिफ्ट/एस्केलेटर यासारख्या महत्त्वाच्या सुविधा सहजपणे शोधता याव्यात यासाठी स्थानकांमधील प्रवेशद्वारांवर ब्रेल नकाशे धोरणात्मकरित्या ठेवण्यात आले आहेत. वापरकर्त्यांसाठी दीर्घकालीन उपयुक्तता आणि आराम सुनिश्चित करण्यासाठी स्पर्शिक नकाशे उच्च टिकाऊपणा आणि वाचनीयता मानकांसह डिझाइन केले आहेत.

प्रवाशांच्या सुविधा सुधारण्यासाठी आणि सर्वांना समान प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी चालू असलेल्या उपक्रमांचा हा प्रयत्न आहे. दिव्यांगजन प्रवाशांना अधिक आरामदायी आणि सन्माननीय प्रवास अनुभव प्रदान करण्यासाठी विभाग सतत पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करत आहे.

ब्रेल मॅप्सची संकल्पना सोलापूर विभागाच्या स्थानकांना सर्वांसाठी सुलभ, आधुनिक आणि प्रवासी-केंद्रित बनवण्याच्या प्रयत्नांचे प्रतीक आहे. ही कल्पना सुगम्य भारत अभियानाच्या उद्दिष्टांशी सुसंगत आहे.

## सोलापूर-हसन एक्सप्रेसला १ थर्ड एसी इकॉनॉमी क्लास कोच, रेल्वे अतिरिक्त जोडणार

**सोलापूर/प्रतिनिधी** :खाली दिलेल्या तपशीलांनुसार प्रवाशांच्या मागणीनुसार रेल्वेने सोलापूर-हसन एक्सप्रेसला १ थर्ड एसी इकॉनॉमी क्लास कोच जोडण्याचा निर्णय घेतला आहे:

सोलापूर-हसन एक्सप्रेसला १ थर्ड एसी इकॉनॉमी क्लास कोच ट्रेन क्रमांक ११३११/११३१२ ला जोडण्याचा निर्णय घेतला आहे.

- २५.१०.२०२५ पासून सोलापूरहून.
- २६.१०.२०२५ पासून हसनहून.

ट्रेन क्रमांक ११३११/११३१२ साठी सुधारित रचना: १ फर्स्ट एसी, २ एसी- टियर, ४ एसी- टियर, १ एसी- टियर इकॉनॉमी, ८ स्लीपर क्लास, ४ जनरल सेकंड क्लास, १ सेकंड क्लास कम लगेज आणि ब्रेक व्हॅन दिव्यांगजनांसाठी कंपार्टमेंटसह, १ लगेज/जनरेटर/ब्रेक व्हॅन आणि १ उच्च क्षमतेची पार्सल व्हॅन. (२३ कोच)

प्रवाशांनी बदल लक्षात घ्यावेत आणि सुविधेचा लाभ घ्यावा अशी विनंती आहे.

## शालेय राज्यस्तरीय कुस्ती ग्रीक रोमन स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा विद्यार्थी महाराष्ट्रात द्वितीय

**लातूर/प्रतिनिधी** : दि.१४ ते १६ ऑक्टोंबर २०२५ या दरम्यान अहिल्यानगर येथे पार पडलेल्या शालेय राज्यस्तरीय कुस्ती ग्रीक रोमन स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचा १२ वीचा विद्यार्थी यू १९ गटात ५५ गटात साईनाथ धाकपडे कुस्ती याने ग्रीक रोमन स्पर्धेत महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक मिळविला आहे.या यशस्वी विद्यार्थ्याला डॉ.महेश बेंबडे,प्रा.निशिकांत सदाफुले,प्रा. विनोद गेवारे,प्रा.वैष्णवी जोशी यांचे मार्गदर्शन लाभले.

सदरील विजयी खेळाडूंचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर, प्रा व्यंकट कैले, प्रा.विजय मांदळे, प्रा.कविता जाधव, प्रा.मनोज पाटील, प्रा.शिवाजी राठोड,प्रा.शैलेश सूर्यवंशी, प्रा.संतोष शेळगे, प्रामंजुषा कदम, प्रा.मेघा भिसे,प्रा. गव्हाने, प्रा.बाजपाई, प्रा.जाधव, प्रा.चिक्राळे,प्रा.गोपाल अवस्थी, कार्यालीन अधीक्षक नवनाथ भालेराव,दिलीप राठोड,रवी लाहोटी,सुहास परवते यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# महापारेषणमध्ये स्वदेशी वस्तू व उत्पादनांचे प्रदर्शन

## व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, संचालक श्रीमती तृप्ती मुधोळकर, श्री. सुचिता भिकाने यांची प्रदर्शनाला भेट देत खरेदी





**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) वतीने दि. १३ ते २१ ऑक्टोबरपर्यंत दिवाळीनिमित्त स्वदेशी वस्तू व उत्पादनांचे प्रदर्शन राज्यभर राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुख्य कार्यालयाच्या प्रकाशगंगा इमारतीत स्वदेशीचा जागर उपक्रमांतर्गत सेंद्रीय अन्नपदार्थ आरोग्यासाठी किती महत्त्वाचे आहे, याबाबतचे महत्त्व पटवून देण्यात आले. प्रदर्शनाला अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

आत्मनिर्भर भारत ही संकल्पना घेऊन स्वदेशी वस्तूंचा वापर व प्रचार व्हावा, यासाठी महिला बचत गटांनी तयार केलेल्या प्रदर्शनाला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, अपर जिल्हाधिकारी तथा कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्रीमती सुचिता भिकाने यांनी प्रदर्शनाला भेट देऊन महिलांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन करून त्यांच्याकडून स्वदेशी वस्तू खरेदी केल्या.

यामध्ये गोमय पणत्या, देशी आकाशकंदील, देशी फराळ, आयुर्वेदिक पदार्थ व वस्तू ठेवण्यात आल्या होत्या. तसेच उटणे, अगरबत्ती, बॅग्ज, इमिटेशन ज्वेलरी, धार्मिक पुस्तके, रांगोळी, कडधान्ये, सेंद्रिय डाळी, साबण, विविध प्रकारचे आकर्षक तोरण, बांबूच्या आकर्षक वस्तू आदींसह खाद्यपदार्थ यांच्यासह विविध वस्तू व उत्पादने विक्रीला आहेत. खरेदीसाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

महिला स्वावलंबी व्हाव्यात, आर्थिकदृष्ट्या गरजू महिलांना रोजगार मिळावा, तसेच स्वदेशी वस्तूच्या मालाला चालना मिळावी, या हेतूने महापारेषणने हे प्रदर्शन आयोजित केले आहे. तरी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापारेषणकडून करण्यात आले आहे.

**सेंद्रीय अन्नपदार्थ आरोग्यासाठी पोषक : डॉ. संजीव कुमार**

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी प्रदर्शनातील सर्व स्टॉलला प्रत्यक्ष भेट देऊन महिलांना प्रोत्साहित केले. तसेच त्यांच्याकडून स्वदेशी वस्तू व उत्पादने खरेदी केली. विशेष म्हणजे सेंद्रिय कडधान्यांच्या स्टॉलला भेट देत तेथील पदार्थांची चव चाखली. वैद्यकीय शिक्षण घेतलेल्या डॉ. संजीव कुमार यांनी सेंद्रीय अन्नपदार्थांचे महत्त्व सांगितल्यामुळे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सेंद्रीय कडधान्यांची खरेदी केली.

# मालमत्ता कर भरण्यासाठी पालिकेतर्फे व्हॅन

## मालमत्ता कर भरण्यासाठी पालिकेने आणखी एक सुविधा उपलब्ध करून दिली आहे



**लातूर/प्रतिनिधी** : लातूर महानगरपालिका कर आकारणी व कर संकलन विभागाने यंदा १०० कोटींच्या मालमत्ता करवसुलीचे लक्ष्य निश्चित केले असून त्याच्या पूर्ततेसाठी प्रशासनाकडून वेगवेगळे उपाय केले जात आहे. मालमत्ता करातील सामान्य करावर विविध सवलत देऊन पालिकेने सप्टेंबरअखेरपर्यंत ३५ कोटींची वसुली केली आहे. करदात्याच्या दारी जाऊन कर वसूल करण्याच्या दृष्टिकोनातून स्मार्ट करसंकलन प्रणाली ही मोबाइल व्हॅन सेवा सुरू करण्यात आली आहे.

आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी व उपायुक्त (कर संकलन) डॉ पंजाब खानसोळे यांच्या संकल्पनेतून ही व्हॅन कार्यान्वित करण्यात आली आहे . मालमत्ता कर शास्ती सूट योजना प्रसिद्धी व प्रचार करणारी ही व्हॅन शहरात दाखल झाली आहे. आज या व्हॅन चे उद्घाटन जिल्हा प्रशासन अधिकारी (नगर पालिका) लातूर श्री अजित डोके व उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांच्या हस्ते करण्यात आले आहे. यावेळी कर अधीक्षक प्रतिक मुसांडे, भांडारपाल बालाजी शिंदे , क्षेत्रीय अधिकारी श्री बंडु किसवे,संतोष लाडलपुरे यांची उपस्थिती होती .

सदरील व्हॅन मुळे नागरिकांना सध्या सुरू असलेल्या ८०% शास्ती माफी योजनेची माहिती मिळण्यास मदत होणार आहे . तसेच शहरातील करदात्यांना आपल्या दारातच कर भरणे सोयीचे होणार आहे.करदात्यांकडूनही या सुविधेस चांगला प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा उपायुक्त डॉ खानसोळे यांनी यावेळी व्यक्त केली .

या व्हॅन मधे संगणक, प्रिंटर व त्याकरिता लागणाऱ्या सर्व सुविधा तसेच ऑपरेटर, ड्रायव्हर आणि सुरक्षा रक्षकही पुरवण्यात आले आहेत.

या व्हॅनद्वारे एखाद्या नगर/सोसाइटी/संस्थेमध्ये मालमत्ता कर वसूल करावयाचा असल्यास ही व्हॅन त्या प्रभाग कार्यालयाकडे पाठवण्यात येणार आहे . या व्हॅनद्वारे मालमत्ता करदात्यांनी कर देयकाची मागणी केल्यास देयकही देण्यात येणार आहे . यामध्ये धनादेश, धनाकर्ष अथवा डेबिट कार्ड, एटीएम कार्डने कर भरण्याची व पावती देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी सर्व थकबाकीदार मालमत्ता धारकानी सध्या सुरू असलेल्या ८०% शास्ती माफी योजनेचा लाभ घेवून आपला थकीत टॅक्स भरणा करावा असेही आवाहन यावेळी उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे.

## शिवानी अशोक पाटील व अर्जुन गौरव बागल यांची राज्यस्तरीय शालेय आर्चरी क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**लातूर/प्रतिनिधी** : लातूर येथे झालेल्या विभागीय शालेय आर्चरी कंपाऊंड स्पर्धेमध्ये पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव ची खेळाडू १९ वर्षाखालील मुलीच्या गटात कुमारी शिवानी अशोक पाटील, तसेच १४ वर्षाखालील मुलांच्या गटात कुमार अर्जुन गौरव बागल यांनी घवघवीत यश मिळवत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले. त्यांच्या या यशाबद्दल स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांनी त्यांचे कौतुक केले तसेच त्यांना त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

स्कूलच्या वतीने स्कूलचे उपप्राचार्य निलेश जाधव सर यांनी शिवानी अशोक पाटील व अर्जुन गौरव बागल यांचे स्कूलच्या वतीने अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी स्कूलचे क्रीडाशिक्षक डॉ. विवेक महाजन सर, कार्यक्रमाधिकारी दीपक अंकुश सर तसेच व्यवस्थापकीय अधिकारी श्री जीवन कुलकर्णी सर उपस्थित होते.

# मुस्लिम बांधवांनी विकासासोबत राहावे; रेणापूर येथील शादी खाना बांधकाम भूमिपूजन प्रसंगी आ. रमेशआप्पा कराड





**लातूर/प्रतिनिधी** : मुस्लिम बांधवांना भाजपाची भीती दाखवून वर्षानुवर्ष काँग्रेसने मते घेतली सत्ता मिळवली मात्र समाजासाठी काहीच केले नाही. भाजपाच्या नेतृत्वातील केंद्र, राज्य शासनाबरोबरच रेणापूर नगरपंचायतीने कुठलाही जाती भेद न ठेवता विविध सर्वांगीण विकासाची कामे केली केलेल्या विकास कामांना साथ द्या भाजपाच्या पाठीशी खंबीरपणे रहा असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर नगरपंचायत अंतर्गत नगर विकास विभागाच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून मुस्लिम बांधवांसाठी बांधण्यात येणाऱ्या २ कोटी रुपये खर्चाच्या शादीखाना आणि १ कोटी रुपये खर्चाच्या ईदगाह मैदानाच्या संरक्षण भिंत बांधकामाचे भूमिपूजन लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते शनिवारी सकाळी झाले.

याप्रसंगी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, तालुक्याचे अमीरसाब शेख युनूस, मौलाना अस्लम, शेख शफीयुद्दीन, मारूफ आत्तार, शेख शहेनशाह, भाजपाचे शहराध्यक्ष अच्युत कातळे, गणेश चव्हाण यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

गोरगरीब सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू म्हणून देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी अनेक योजना सुरू केल्या या योजनेचा असंख्य गोरगरीब आणि गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळाला. योजनेचा लाभ देताना कधीच भेदभाव केला नाही असे सांगून यावेळी मुस्लिम बांधवांशी संवाद साधताना आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, रेणापूर नगरपंचायत भाजपाच्या ताब्यात आल्यानंतर विविध कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी आणला. सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, पाणीपुरवठा योजना, रेणुकादेवी मंदिर परिसरात भक्त निवास, बालाजी मंदिर येथे भव्य सभागृह, सम्राट अशोक बौद्ध विहार, अहिल्यादेवी होळकर सभागृह यासह प्रत्येक समाज बांधवांचे हित आणि सोय लक्षात घेऊन अनेक विकासाची अनेक कामे केली कुठलाही भेदभाव केला नाही. त्यामुळे मुस्लिम बांधवांनी बुद्धिभेद करणाऱ्या पासून सावध रहून विकासाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे बोलून दाखविले.

याप्रसंगी आ. रमेशआप्पा कराड यांच्यासमवेत मुस्लिम बांधवांनी अत्यंत मनमोकळेपणाने विविध विषयावर संवाद साधला. मुस्लिम बांधवांसाठी तीन कोटी रुपयांचा एवढा मोठा निधी पहिल्यांदाच मिळाल्याने समाधान व्यक्त करून यावेळी मुस्लिम बांधवांच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांचा यथोचित सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले.

भाजपाचे शेख अजीम, दत्ता सरवदे, दिनकर राठोड, चंद्रकांत कातळे, विजय चव्हाण, उज्वल कांबळे, राजू आलापुरे, उत्तम चव्हाण, महेश गाडे, संतोष राठोड, नारायण राठोड, अंतराम चव्हाण यांच्यासह मुस्लिम बांधव अबूबकर मौलाना, शेख खुदूस, रफिक शिकलकर, अखिल कुरेशी, युनुस शेख, सलीम शेख, सय्यद खुदुस, युसुफ पठाण, मोहसीन सय्यद, हमिद कुरेशी, शेख इसाक, मुसा शेख, रफिक कुरेशी, जहिरोदिन, शाहनवाज खुरेशी, समीर शेख, गफूर खुरेशी, सत्तार फकीर, महबूब फकीर, वसीम शेख, मैनुद्दीन बावचकर, शौकत सय्यद, वाजिद शेख, अफजल सय्यद, चांदसाब फरीद, संदीप बावचकर, युनूस शेख, रफिक बागवान, मुज्जफर सय्यद, खदीर शेख, गफूर सय्यद, अहमदखा पठाण, आयुब पठाण, बाबुभाई फरीद यांच्यासह मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शालेय जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलांचा संघ द्वितीय



**लातूर/प्रतिनिधी** : शालेय जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा मुले दि.१६.१० .२०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल येथे पार पडल्या.या स्पर्धेत दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलांचा क्रिकेट स्पर्धेत संघ जिल्ह्यात द्वितीय आला.या यशस्वी विद्यार्थ्याला डॉ.महेश बेंबडे,प्रा.निशिकांत सदाफुले,प्रा. विनोद गेवारे,प्रा.वैष्णवी जोशी,रूषी मस्के, शुभम सदाफुले यांचे मार्गदर्शन लाभले.

सदरील विजयी खेळाडूंचे अभिनंदन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर,प्रा व्यंकट कैले, प्रा.विजय मांदळे, प्रा.कविता जाधव, प्रा.मनोज पाटील, प्रा.शिवाजी राठोड, प्रा.शैलेश सूर्यवंशी, प्रा.संतोष शेळगे,प्रामंजुषा कदम,प्रा.मेघा भिसे,प्रा.गव्हाने प्रा.बाजपाई,प्रा.जाधव,प्रा. चिक्राळे, प्रा.गोपाल अवस्थी, कार्यालीन अधीक्षक नवनाथ भालेराव, दिलीप राठोड, रवी लाहोटी, सुहास परवते यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# तिरंगी क्रिकेट स्पर्धेत वाजिद इलेव्हनचा विजयी जल्लोष!

: सिरीजमधील उत्कृष्ट प्रदर्शने :
सामनावीर, मालिकावीर :
– संग्राज तळेवाडीकर
उत्कृष्ट फलंदाज :
– जब्बार भाई बागवान
उत्कृष्ट गोलंदाज :
– दत्ता साळुंके
उत्कृष्ट क्षेत्ररक्षक:
–अशफाक सय्यद



**लातूर/प्रतिनिधी :** मैत्री क्रिकेट क्लब आयोजित तिरंगी क्रिकेट स्पर्धा दयानंद मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडली. या रोमांचक स्पर्धेत वाजिद इलेव्हन संघाने प्रभावी खेळ करत विजेतेपद पटकावले, तर मुसिब इलेव्हन संघ उपविजेता ठरला. गोपाल इलेव्हन संघाने देखील चुरशीची लढत देत प्रेक्षकांची मने जिंकली.

स्पर्धेतील सामन्यांदरम्यान चौकार–षटकारांचा वर्षाव आणि गोलंदाजांच्या अचूक चेंडूंनी मैदानात उत्साहाचे वातावरण निर्माण केले. प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या गजरात प्रत्येक सामना रंगतदार ठरला.स्पर्धेच्या समारोप प्रसंगी पारितोषिक वितरण समारंभात मैत्री क्रिकेट क्लबचे पदाधिकारी, मान्यवर व क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विजेत्या व उपविजेत्या संघांना आकर्षक ट्रॉफी आणि वैयक्तिक पारितोषिके देण्यात आली.

या स्पर्धेमुळे लातूर शहरातील क्रिकेटप्रेमींना थरारक आणि अविस्मरणीय अनुभव मिळाला. तरुण खेळाडूंच्या जिद्दीचा आणि संघभावनेचा प्रत्यय मैदानावर प्रत्येक क्षणी जाणवला.

# मातोश्री वृध्दाश्रमातील आजी आजोबांना फराळांचे वाटप करुन मुक्तांगण व लॉर्ड श्रीकृष्णच्या चिमुकल्यांनी साजरी केली आगळी वेगळी दिवाळी

**लातूर/प्रतिनिधी :** लातूरच्या विशालनगर परिसरातील मातोश्री कलावती प्रतिष्ठान संचालित मुक्तांगण इंग्लिश स्कूल व लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुलच्या चिमुकल्यांनी शहालगत असणाऱ्या मातोश्री वृध्दाश्रमात आजी आजोबांसोबत यंदाची दिवाळी अतिशय उत्साहात साजरी केली आहे. यावेळी या विद्यार्थ्यांनी येथील आजी आजोबांना फराळाचे वाटप करत त्यांना त्यांच्या पासून पोरक्या झालेल्या नातवंडाचा सहवास दिला व त्यांना या दिवाळीच्या शुभेच्छा देऊन त्यांच्याकडून आशिर्वाद घेतले. या प्रसंगी श्रीकृष्ण लाटे यांनी आजी आजोबांची काळजी घेण्यास सूचित केले, तसेच मुलांच्या शालेय जीवनात गोष्टींच्या माध्यमातून त्यांचा भाषा विकास करण्यात आजी आजोबांचे मोलाचे योगदान असते. घरोघरी मुलांवर संस्कार घडवण्याचे काम नेहमीच आजी आजोबा करत असतात हे मार्गदर्शनपर सांगितले. सर्व आजीआजोबा व विद्यार्थ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.

मुक्तांगण व लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलच्या चिमुकल्यांनी आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात सर्व आप्तेष्टांपासून पोरके झालेल्या मातोश्री वृध्दाश्रमातील आजी आजोबांना फराळाचे वाटप करुन तेथेच त्यांच्या सोबत अनेक चांगल्या गप्पा गोष्टी करत त्यांच्याही दिवाळीतील पर्वाला सुखद करण्याचा प्रयत्न केला आहे. लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थी सानवी कदम, संस्कृती चव्हाण आणि राजदीप पवार शाळेचे शिक्षक पवन माळी, गणेश कुलकर्णी यांनी भजन व दिवाळी गीत गाऊन आजीआजोबांचा आनंद द्विगुणीत केला. तसेच शाळेच्या शिक्षिका अर्चना शिंदे यांनी आजी आजोबा



या कवितेचे सुंदररीत्या सादरीकरण केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी गहू, ज्वारी, तांदूळ या स्वरुपात भेट दिली. श्री अतुल गन्जेवर व सौ पल्लवी गन्जेवर या शाळेच्या पालकांनी भेट देऊन विशेष सहकार्य केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी मातोश्री वृध्दाश्रमातील आजी आजोबांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी मातोश्री वृध्दाश्रमाचे व्यवस्थापक नरसिंह कासले, प्रा. भरत चव्हाण यांनी विशेष सहकार्य केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे श्रीकृष्ण लाटे, कविता लाटे, मुक्तांगणच्या प्राचार्या सुमेरा शेख व लॉर्ड श्रीकृष्णचे प्राचार्या रुपाली कुलकर्णी, मुक्तांगण इंग्लिश स्कुलच्या समन्वयिका माधुरी वाघमारे, लॉर्ड श्रीकृष्ण इंग्लिश स्कुलचे समन्वयक रौफ शेख, समन्वयिका रुपाली कोकाटे, नम्रता झांबरे, प्रियांका नागलबोने, विद्या पाटील, दोन्ही शाळेचे शिक्षक, शिक्षिका, व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शाळेच्या शिक्षिका मयुरी देशमुख यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दोन्ही शाळेतील शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

## भेटा ..

दिवाळी निमित्ताने
भेटीला कारण भेटे
वठलेल्या संबंधांना
अंकुर सहजते फुटे

धकाधकीचे जीवन
कुणी कुणा ना भेटे
कधीतरी भेट जरुरी
भले रोज नको खेटे

दुजांनीयावे भेटीला
प्रत्येकांला हेचं वाटे
घ्यावेकुणी पुढाकार
इथेच संबंध ते फाटे

उसळू येतो अहंकार
उगाचं फोडतो फाटे
वाढत जातोयं दुरावा
नाती होतात उरफाटे

भेटीस्तव तळमळतो
बांधले डोक्यास फेटे
एक टाळतो गाठभेट
दुजा घालतो हेलपाटे

भेटवस्तू सहीत कुणी
घेतो सहेतूक गाठभेट
मिंधे करी समोरच्यास
मग अपेक्षा व्यक्त थेट

कधी काहींना सवय
दिसेल तिथे तो गाठे
अजीर्ण असे भेटींचे
कधी रे थांबायचेकुठे

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# ६५ वर्षीय बेवारस महिलेचे ९ महिन्यांच्या उपचारानंतर वि.दे.शा.वै. म. व रुग्णालयामार्फत सेवाभावी संस्थेमध्ये केले पुनर्वसन




**लातूर/प्रतिनिधी :** दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी संध्याकाळी अनोळखी बेवारस महिलेस काळे हॉस्पिटल, लातूर जवळून १०८ या रुग्णवाहिकेने पुढील उपचारासाठी विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, लातूर येथे अपघात विभागात दाखल करण्यात आले होते. सदर महिलेस बोलता, चालता येत नव्हते व जनरलाइज विकनेस होता, त्यामुळे औषधवैद्यकशास्त्र विभागाच्या अंतर्गत वार्ड नंबर ११ मध्ये अनोळखी बेवारस महिलेस दाखल करण्यात आले होते. त्यानुसार समाजसेवा अधीक्षक विभागाच्या मार्फत सदर बेवारस रुग्णांची माहिती घेण्यात आली परंतु रुग्ण माहिती देण्याच्या मनस्थितीत नव्हता व त्या रुग्णांसोबत कोणीही नातेवाईक किंवा ओळखीचा कोणताही पुरावा नव्हता. जवळपास नऊ महिने डॉक्टरांनी उपचार केला व सदर रुग्णास दुरुस्त केले. त्या कालावधीमध्ये रुग्णालयातील डॉक्टर्स, अधिपरिचारिका, आया यांनी शुश्रूषा केली व संबंधित डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रुग्णाला सुट्टी देण्यात आली.

रुग्ण बेवारस असल्याकारणाने समाजसेवा अधीक्षक विभागाच्या वतीने श्री प्रशांत एवरीकर, रुद्र प्रतिष्ठान लातूर या संस्थेत संपर्क साधून या संस्थेच्या वतीने सदर रुग्णास डॉक्टर राजेंद्र धामणे सेवा प्रतिष्ठान अहिल्यानगर या ठिकाणी रुग्णाबाबतची संपूर्ण माहिती कळविण्यात आली त्यानुसार विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, डॉ. अजय ओहाळ, उप अधिष्ठाता, डॉ.उमेश कानडे, उप अधिष्ठाता, डॉ. सचिन जाधव, वैद्यकीय अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली रुद्र प्रतिष्ठान लातूर व समाजसेवा अधीक्षक विभाग यांच्या सहकार्याने रुग्णवाहिकेमार्फत सदर बेवारस महिलेस पाठवण्यात आले.

सदर कार्यवाही करिता समाजसेवा अधीक्षक श्री संजय कांबळे, श्री सुरेंद्र सूर्यवंशी व श्री रमेश इंगळे यांनी परिश्रम घेतले.

# सोयाबीनच्या काढणीला आला वेग, मजुरांची आडचण

**रेणापूर/प्रतिनिधी :** रेणापूर तालुक्यात व रेणा मध्यम प्रकल्पाच्या परिसरात झालेल्या पावसामुळे २० ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत रेणा प्रकल्पातून जवळपास सोळा वेळेला रेणा नदी पात्रात पाण्याचा विसर्ग करावा लागला. त्यामुळे शेतात साचलेले पाणी शेताच्या बाहेर न पडल्यामुळे शेतातील ऊस व सोयाबीनसह इतर सर्वच पिकांमध्ये आजही कांही प्रमाणात पाणी साचलेले आहे. परिणामी पिकांचे मोठे नुकसान होत आहे.

काढणीला आलेले सोयाबीनच्या शेंगा उन्हाने तडकून फुटत आहेत. त्यामुळे सोयाबीनची नासाडी होत आहे कांही ठिकाणी ओल्या शेंगांना करे फुटत असल्याने उरले सुरले पिकही शेतकऱ्यांच्या हाती लागण्याची शक्यता धुसर होत आहे. सध्या सोयाबीनच्या काढणीला वेग आला असून यासाठी शेतकऱ्यांना मजुरांची शोधाशोध करावी लागत आहे. सोयाबीन काढणीसाठी एकरी साडेपाच ते सहा हजाराचा शेतकऱ्यांना खर्च येत असून त्यामानाने उत्पादन होत नाही त्यामुळे कांही शेतकऱ्यांना काढणीचा खर्च पदरून करावा लागत आहे ऐन दिवाळीत शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

रेणा मध्यम प्रकल्पातून नदीपात्रात ऑगस्ट महिन्यात सहा वेळा तर सप्टेंबर महिन्यात दहा वेळा पाणी सोडण्यात आले. या पाण्यामुळे नदीकाठच्या शेतातील पिकांना मोठा फटका बसला. आजही तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांच्या शेतात पाणी असल्याने शेतात जाता येत नाही. दोन तीन दिवसांपासुन ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे जर आनखी पाऊस झाला तर परिस्थिती आनखी गंभीर बनण्याची शक्यता असून रब्बीच्या पेरण्याना विलंब होत आहे.

# दिवाळी निमित्त नागरिकांची आशियाना निवासस्थानी शुभेच्छा देण्यासाठी गर्दी

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी दिल्या सर्वांना शुभेच्छा

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांच्या आशियाना निवासस्थानी दीपावलीच्या दुसऱ्या दिवशी शनिवारी धनत्रयोदशीच्या दिवशी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांची जिल्हाभरातील विविध ठिकाणांहून आलेल्या नागरिक काँग्रेस पदाधिकारी सहकारातील नामवंत संस्थांचे पदाधिकारी मांजरा साखर परिवारातील संस्थांचे प्रतिनिधी यांनी भेट घेतली. दिवाळी निमित्त शुभेच्छा दिल्या यावेळी साहेब यांनी आलेल्या नागरिकांना धनत्रयोदशीच्या शुभेच्छा दिल्या. दिवाळी सर्वांना आनंदात



जावो अशा शुभेच्छा दिल्या नागरिकांकडून करण्यात आलेल्या सत्काराचा आदरपूर्वक स्वीकार केला यावेळी आशियाना निवासस्थान हाऊसफुल दिसत होते

यावेळी जागृती शुगर चे संचालक दिलीप माने, रेणा साखर कारखान्याचे अध्यक्ष अनंतराव देशमुख, मारुती महाराज साखर कारखान्याचे अध्यक्ष शाम भोसले, जिल्हा बँकेचे संचालक सुनील कोचेटा,अभय कासट सचिन पाटील, सचीन दाताळ संभाजी सुळ हरिराम कुलकर्णी, मनोज पाटील बाळासाहेब देशपांडे, रमेश पाटील,सुरेश पाटील, भिसे, विरसेन भोसले, संजय नीलेगावकर, रेणाचे संचालक कवी इंगळे, हाके,पाटील, व्यंकटराव पाटील, सतीश चव्हाण, विविध संस्थांचे पदाधिकारी कार्यकारी संचालक शासकीय अधिकारी डॉक्टर इंजिनिअर प्राध्यापक, शिक्षक, सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

दिवाळी सर्वांना आनंदात जावो यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी उपस्थित सर्वांना दिवाळीनिमित्त शुभेच्छा देत ही दिवाळी निरोगी आनंदात जावो अशा शुभेच्छा यावेळी दिलीपराव देशमुख यांनी सर्वांना दिल्या

# पूरग्रस्त शेतकरी बांधवांना गोधनाचे वाटप; खा. डॉ. शिवाजी काळगे यांच्या हस्ते वितरण

**लातूर/प्रतिनिधी :** श्री गुरु गणेश जीवराज जैन गो–शाळेच्या वतीने वसुबारस दिनानिमित्त पूरग्रस्त शेतकरी बांधवांना चार बैल व दोन गायींचे वाटप खा. डॉ. शिवाजी काळगे व पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपआयुक्त डॉ. श्रीधर शिंदे यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.याप्रसंगी उद्योजक दिलीप माने, उद्योजक मनोहरराव कोरे, डॉ. हंसराज बाहेती, कांचनमाला संगवी, जैन श्रावक संघाचे अध्यक्ष विपीन कोचेटा, गोशाळेचे

अध्यक्ष डॉ. दीपक गुगळे, संजय बोरा, हेमंत बोरा, रवींद्र दर्डा, प्रतीक दर्डा, सचिन मालू, भाले काका, डॉ. साळवे, डॉ. कोकणे, डॉ. क्षीरसागर, डॉ. कलवले, संगीता बोरा, नूतन डुंगरवाल आदी उपस्थित होते. याप्रसंगी नंदाबाई मनोहरराव कोरे यांच्याकडून गोमाता गोग्रासासाठी ५१ हजारांची देणगी गोशाळेस देण्यात आली. त्यांचा सन्मान खा. डॉ. काळगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी खा. डॉ. काळगे यांनी गोशाळेच्या कार्याची प्रशंसा करीत समाधान व्यक्त केले व सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. सूत्रसंचालन गोशाळेचे सचिव शरद डुंगरवाल यांनी केले.



टोनर रिफिलिंग
फक्त ₹ ३००/-
गारन्टेड प्रिंटिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
प्रिंटर्स पॅराडाईस
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

# निलंगा येथील निळकंठेश्वर मंदिराला मिळणार राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा

माजी मंत्री, आ. संभाजी पाटील निलंगेकर यांचा पाठपुरावा कामी

**निलंगा/प्रतिनिधी :** शहराचे ग्रामदैवत निळकंठेश्वर मंदिर ऐतिहासिक असून याची ओळख दक्षिण काशी म्हणूनही आहे. शेकडो वर्षाचा इतिहास असलेल्या या मंदिराला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळावा, अशी मागणी माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली होती. या संदर्भात राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांची भेट घेवून माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी निळकंठेश्वर मंदिराची संपूर्ण माहिती दिली. यावेळी शेलार यांनी तात्काळ याबाबत सकारात्मकता दाखवत निळकंठेश्वर मंदिराला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळण्यासाठी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता निलंग्याच्या निळकंठेश्वर मंदिराला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळून हा ऐतिहासिक वारसा जपला जाणार आहे.

निलंगाचे ग्रामदैवत असलेले निळकंठेश्वर मंदिराची उभारणी चालुक्यांच्या काळात झाली असून हे मंदिर म्हणजे स्थापत्य आणि मूर्तीकलेचा उत्कृष्ट नमूना आहे. या मंदिरात दोन गर्भगृह असून मुख्य गर्भगृहात शिवलिंग स्थापित झाले आहे. तसेच दुसया गर्भगृहात अतिशय दूर्मिळ मानली जाणारी उमा महेश्वर यांची मूर्ती आहे. मंदिराच्या बाह्यभागावर शंभरहून अधिक विलोभनिय शिल्पमूर्ती कोरलेल्या असून यामध्ये शिव, विष्णू, महिशासूर मर्दिनी यासारख्या देवतांसह सूर सुंदरीच्या प्रतिमांचा समावेश आहे. मंदिराच्या दर्शनासाठी आणि मंदीर



पाहण्यासाठी लातूर जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील अनेक भाविक सातत्याने निलंगा येथे येत असतात.

श्रावण महिन्यात तर कर्नाटकातूनही अनेक भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. काळाच्या ओघात या मंदिराची थोडीफार झालेली झिज लक्षात घेवून आणि या मंदीराचे मूळ रूप परत आणण्यासाठी माजी मंत्री आ. निलंगेकर यांच्या माध्यमातून या मंदिराच्या संवर्धनाचे काम पुरातन खात्याच्या वतीने सुरू झाले आहे. याकरिता राज्य सरकारच्या माध्यमातून अकरा कोटी तेविस लाखांचा विशेष निधीही उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. विशेष म्हणजे या मंदिराच्या लगतच दुर्मिळ अशा खारवणी व गोडवणी अशी दोन बारवा आहेत. ऐकमेकांना लागून असलेल्या या दोन जलस्त्रोतापैकी एकात गोड तर दुसयात खारे पाणी आहे. अतिशय वैशिष्ट्यपूर्ण व चमत्कारिक असलेल्या या बारवांचेही जतन होणे तितकेच आवश्यक असल्याचे माजी मंत्री आ. निलंगेकर यांनी सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या निदर्शनास आणून दिले.

निळकंठेश्वर मंदिर आपल्या शहराचा आत्मा असून हजारो वर्षापासून श्रध्दा, इतिहास आणि कला या त्रिवेणीचा सगंम येथे असल्याचे सांगितले. हा ऐतिहासिक आणि पुरातन ठेवा जतन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी असल्यामुळे या मंदिराला राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळावा यासाठी पाठपुरावा केला होता,. सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी यास मान्यता दिल्याबद्दल त्यांचे आभार या निर्णयामुळे निळकंठेश्वर मंदिर केवळ जिल्ह्याच्याच नव्हे तर मराठवाडा आणि राज्याच्या नकाशावर झळकणार आहे.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६